रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३०२ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

### ‘मी कशाला राष्ट्रवादी वाढवू’?

**बार्शी :** बार्शीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा फारसा प्रभाव दिसत नसताना इथे पक्षाचं वर्चस्व कसं वाढवणार? अशी विचारणा केली असता अर्चना पाटील म्हणाल्या, मी कशाला राष्ट्रवादी वाढवू? मला तर काही कळतच नाही. मी महायुतीची उमेदवार आहे. मी मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आणि एनडीए ४०० पार करण्यासाठी निवडणूक लढवत आहे, असं त्या म्हणाल्या.तीन दिवसांपूर्वी अर्थात ४ एप्रिल रोजी अर्चना पाटील यांचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला.

रायगड, सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

### एकनाथ खडसे स्वगृही परतणार

**मुंबई :** तीस वर्षांहून अधिक काळ भाजपात राहून शरद पवारांच्या राष्ट्रवादीत गेलेले एकनाथ खडसे आता पुन्हा भाजपात परतणार आहेत. त्यांनीच याबाबत आज पत्रकारांना सांगितले. एकनाथ खडसे म्हणाले, भारतीय जनता पक्षातील जे जुने कार्यकर्ते आणि नेते आहेत, त्यांच्याशी चर्चा करत असताना ते म्हणायचे की तुम्ही भाजपात असायला हवे होते. तुम्ही आलात तर बरे होईल. आता केंद्रीय नेतृत्त्वाशी चर्चा करून ते सांगतील त्या तारखेला मी दिल्लीत येऊन भाजपात प्रवेश करणार आहे. असे ते म्हणाले.



## १६९१ पैकी १३५८ जणांनी शस्त्र केली जमा

# रायगड पोलीस अग्नीशस्त्रांच्या प्रतीक्षेत

आविष्कार देसाई

। रायगड ।

**लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रायगड पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. आतापर्यंत पोलिसांनी एक हजार ६९१ अग्नीशस्त्र परवानाधारकांकडील एक हजार ३५८ शस्त्रे जमा केली असून, १८२ जणांनी अद्याप ती जमा केलेली नाहीत. निवडणुकीचा बिगुल वाजताच शहरातील अधिकृत शस्त्र परवानाधारकांनी शस्त्र जमा करावीत, असे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले होते. हा आदेश ६ जूनपर्यंत लागू राहणार आहे. सदरची आकेडवारी ही ४ एप्रिल २०२४ पर्यंतची आहे.**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी, एमपीडीए व प्रतिबंधात्मक कारवाया, हिस्ट्रीशीटरवर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले आहे. त्याशिवाय निवडणुकीत प्रामुख्याने परवानाधारक शस्त्र जप्त करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या हद्दीतील सध्या १६९१ शस्त्र परवानाधारक आहेत, पैकी १३५८ जणांनी आपापली शस्त्रे संबंधीत पोलिस ठाण्यात जमा केली आहेत, तर १८२ जणांनी अद्याप जमा केलेली नाहीत.

मावळ लोकसभा पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये ७८० शस्त्र परवानाधारक आहेत.

**निवडणूक प्रक्रियेशी संबंधित व्यक्तींकडून निवडणूक प्रक्रिया सुरू असताना प्रक्रियेला गालबोट लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्याकडून शस्त्रांचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा परवानाधारकांकडून निवडणुकांपूर्वी शस्त्रे जमा करण्यास सुरुवात केली जाते. पोलिस अधीक्षक, अपर पोलिसअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीकडून परवानाधारक शस्त्रे बाळगणाऱ्यांची शहानिशा करण्यात येते. निवडणूक प्रक्रियेशी संबंध असलेल्यांकडून शस्त्रे जमा करण्याच्या सूचना देण्यात येते.**

- **१८२ जणांचा शस्त्र जमा करण्यास विलंब**
- **निवडणुकीपर्यंत शस्त्र जमा करण्यास मुदत**

पैकी ४२३ जणांनी आपल्याकडील शस्त्रे जमा केली असून ४२ परवानाधारकांनी अद्याप शस्त्र पोलिसांकडे जमा केली नाहीत.

जिल्ह्यात ८० टक्के शस्त्र परवानाधारक हे उद्योग, व्यापार, राजकीय क्षेत्रातील असून जीवितास धोका, वैयक्तिक सुरक्षेच्या कारणातून परवाने घेतले आहेत त्यांची संख्या १२८८ आहे, त्यांच्याकडे १३५५ शस्त्रे आहेत. २२ खेळाडूंकडे ६८ शस्त्र आहेत. १७५ शेतकऱ्यांकडे तेवढीच शस्त्रे आहेत. बँकेच्या ३३ सुरक्षा रक्षकांकडे ४६ बंदुका आहेत, तसेच १० संस्थांकडे २१ शस्त्रे आहेत. १६ सुरक्षा रक्षकांकडे २६ शस्त्रे आहेत.

शस्त्राचा निवडणुकीदरम्यान गैरवापर होऊ नये, या हेतूने निवडणुकीच्या कालावधीत शस्त्र जमा करणे बंधनकारक असते. मात्र, काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने सरसकट शस्त्र गोळा न करण्याचा निकाल दिला होता. यंदा निवडणूक आयोगाने पान २ वर



## शिवशाही- रिक्षामध्ये भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

**। माणगाव। प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर शिवशाही बस आणि रिक्षा यांच्यामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये रिक्षातील तिघांचा मृत्यू झाला. माणगाव शहराजवळील मानस हॉटेलसमोर रविवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार शिवशाही बस ही ठाणे वरून दापोलीकडे जात असताना रिक्षामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षामधील दत्तात्रय वरंदेकर, प्रवीण मालुसरे व गणेश बाबू जाधव सर्व राहणार ठाणे या तिघांचा मृत्यू झाला. बसची धडक जोरदार बसल्याने रिक्षाचा चक्काचूर झाला आहे. बसचे देखील मोठे नुकसान झाले आहे. मात्र, या अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस पोलीस घटनास्थळी तातडीने दाखल झाले. मृतांना उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे आणण्यात आले. अपघाताचे वृत्त कळताच मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. महामार्गावर अपघात होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.






आजचा अग्रलेख

**भाजप नावाची गँग**

## हरिहरेश्वरमध्ये स्व.मीनाक्षी पाटील यांचा दशक्रिया विधी







**श्रीवर्धन :** शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्वर्गीय मीनाक्षी पाटील यांचे दशक्रिया विधी रविवारी श्रीवर्धन-हरिहरेश्वर येथे पार पडले. याप्रसंगी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील,जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, निता पाटील, शैला पाटील, साधना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, माजी नगरसेवक प्रदीप नाईक आदी सर्व नगरसेवक, पाटील कुटुंबिय व कार्यकर्ते विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. घरातील व्यक्तींसह आप्तेष्ट उपस्थित होते. स्वर्गीय मीनाक्षी पाटील यांचे उत्तरकार्य बुधवारी १० एप्रिल रोजी पेझारी येथील राहत्या घरी होणार आहे.

## प्रचारातून घटक पक्षाने अंग चोरले?

- **भाजपा जिल्हाध्यक्ष अनुपस्थित, शिंदे गटाचे दबावतंत्र सुरु**
- **महायुतीच्या तटकरेंची डोकेदुखी वाढली**




**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूक प्रचाराचा धुरळा उडण्यास सुरुवात झाली आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारासाठी सर्व घटक पक्षांनी प्रचाराचे मैदान मारले आहे. दुसरीकडे महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या घटक पक्षातील प्रमुख असणारा भाजपा आणि शिंदे गटाने प्रचारातून अंग काढून घेतल्याचे चित्र आहे. उमेदवारी न मिळाल्याने भाजपाचे जिल्हाध्यक्ष नाराज आहेत, तर शिंदे गटाला राज्यात अपेक्षीत जागा मिळत नसल्याने दबाव टाकण्यासाठी प्रचारातून दुर राहण्याच्या सूचना दिल्याची रायगड लोकसभा मतदार संघात जोरदार चर्चा आहे.

रायगड लोकसभा निवडणुकीत १२ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार असून १९ एप्रिल अंतिम मुदत आहे. २० एप्रिलला उमेजवारी अर्जाची छाननी होणार आहे. उमेदवारी माघार घेण्याची शेवटची तारीख २२ एप्रिल आहे. ७ मे रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. ७ जूनला मतमोजणी होणार आहे. त्यानुसार निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. इंडिया आघाडीत शिवसेनेचे अनंत गीते यांनी प्रचाराचे रान उठवले आहे. त्यांच्या प्रचारासाठी घटक पक्षातील सर्व पदाधिकारी आवर्जून उपस्थित राहात असल्याचे दिसून येते. भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशिल पाटील हे उमेदवारीसाठी इच्छुक होते, मात्र त्यांचे लोकसभेचे तिकीट हुकल्याने ते आणि त्यांचे समर्थक प्रचंड नाराज असल्याचे बोलले जाते. सुनील तटकरे यांच्या प्रचारासाठी भाजपाने मतदार संघात मेळावे पान २ वर

वे|ध|क

### मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**रायगड :** रायगड आणि मावळ लोकसभा मतदारसंघातील सात विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रानुसार मतदान यंत्रांची प्रथम सरमिसळ प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर खुटवड तसेच इतर वरिष्ठ अधिकारी आणि राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली ऑनलाईन पद्धतीने ही सरमिसळ करण्यात आली. जिल्ह्यातील मतदार संख्येच्या प्रमाणानुसार, २ हजार ७१९ मतदान केंद्र आहेत. सध्या रायगड जिल्ह्यासाठी सहा हजार ७८० बॅलेट युनिट, तीन हजार ७७४ कंट्रोल युनिट तर तीन हजार ९५२ व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रेल उपलब्ध आहेत. या सर्व विधानसभा मतदार संघात मतदान केंद्राच्या १३८ टक्के बॅलेट आणि कंट्रोल युनिट वाटप करण्यात येणार आहे. तर १४५ टक्के व्हीव्हीपॅट वाटप करण्यात येणार आहेत.

## फडणवीसांना तावडेंनी चितपट केलंय



**सुषमा अंधारेंची सूचक पोस्ट**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पंकजा मुंडे-महादेव जानकर यांना उमेदवारी, जळगावचा जाहीर उमेदवार बदलण्याची तयारी, एकनाथ खडसे यांची पुन्हा अमित शाह यांच्याशी भेट, देवेंद्र फडणवीसांना भेटीसाठी दोन-दोन दिवस वाट पाहावी लागणं, पण त्याचवेळी नवनीत राणा यांना मात्र तासाभरात भेट या सगळ्याचा अर्थ फडणवीसांना विनोद तावडेंनी चितपट केलं आहे, अशी पोस्ट सुषमा अंधारे यांनी केली आहे. या पोस्टसोबत ‘आता कधीच येणार नाही’ असा हॅशटॅगही त्यांनी दिला आहे. देवेंद्र फडणवीसांच्या ‘मी पुन्हा येईन’ या व्हायरल घोषणेवरून हा टोला लगावल्याचं बोललं जात आहे.

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशात व राज्यातही सत्ताधारी-विरोधकांमध्ये कलगीतुरा रंगल्याचं पहायला मिळत आहे. वेगवेगळ्या मुद्द्यांवरून दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार असून त्यासाठी अवघे दोन आठवडे शिल्लक राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी व विरोधकांकडून विविध मुद्द्यांवरून एकमेकांना लक्ष्य केलं जात आहे. ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी एक्सवर केलेल्या एका पोस्टचीही अशीच चर्चा चालू आहे.

२०१९ च्या लोकसभा व त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकांवेळी विनोद तावडे देवेंद्र फडणवीसांवर नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. विनोद तावडेंबरोबरच तेव्हा नाराजांमध्ये आता बीडमधून उमेदवारी मिळालेल्या पंकजा मुंडे, पुढच्याच वर्षी भाजपासोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलेले एकनाथ खडसे यांच्या नावांचाही उल्लेख करण्यात आला होता. त्यावेळी एकनाथ खडसेंनी त्यांची नाराजी उघडपणे फडणवीसांविरोधात बोलूनही दाखवली होती. तेव्हापासून विनोद तावडेंना राष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत.

### ‘सरकारविरोधात कोणीच बोलत नाही’

**। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।**

५४३ खासदारांपैकी ३९० खासदार ग्रामीण भागातून येतात. मात्र, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सरकारच्या विरोधात बोलण्याची कोणाचीही हिंमत होत नसल्याचे वक्तव्य स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केलं आहे. ईडी , सीबीआई , इन्कम टॅक्स यांच्या दबावामुळं समाजाचे प्रश्न मांडले जात नसल्याचे राजू शेट्टी म्हणाले. जिल्ह्यातील बावची इथं आयोजीत करण्यात आलेल्या प्रचारसभेत राजू शेट्टी बोलत होते.

राजू शेट्टी हे हातकणंगले लोकसभामतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्यासमोर शिवसेना शिंदे गटाचे धैर्यशील माने आणि ठाकरे गटाचे सत्यजीत पाटील यांचे आव्हान आहे. पान २ वर

## सत्तेत आल्यानंतर संपत्तीचं सर्वेक्षण करणार

**राहुल गांधींची घोषणा**

**। तेलंगणा । वृत्तसंस्था ।**



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी तेलंगणमध्ये एका सभेला संबोधित करताना संपत्तीच्या वाटपाचा मुद्दा उपस्थित केला आहे. देशामध्ये कुणाकडे किती संपत्ती आहे, याचं एक सर्वेक्षण करुन त्याचं वाटप करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं आहे.

जेवढी लोकसंख्या तेवढा हक्क या घोषणेबद्दल राहुल गांधांनी सांगितलं. जर काँग्रेस पक्ष सत्तेमध्ये आला तर देशातली सर्वाधिक संपत्ती कुणाकडे आहे, याचं सर्वेक्षण करण्यासाठी एका वित्तीय संस्थेचं गठण करण्यात येईल, असं ते म्हणाले. जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर राहुल गांधी यांनी हैदराबादमध्ये याबाबत भाष्य केलं आहे. यापूर्वी राहुल यांनी जातनिहाय जनगणा करण्याचा शब्द दिलेला आहे.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, काँग्रेस सत्तेमध्ये आल्यास देशामध्ये ओबीसी, एस.सी., एस.टी. आणि अल्पसंख्याक समूदायातील लोक किती आहेत, याचं सर्वेक्षण अगोदर केलं जाईल. त्यानंतर संपत्तीचं समान वाटप करण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचललं जाईल. त्यानुसार एक वित्तीय संस्था आणि संस्थात्मक पातळीवर सर्वेक्षण केले जाईल. ज्याची जेवढी लोकसंख्या त्यांना तेवढा हक्क मिळवून देण्यासाठी काँग्रेस पावलं उचलणार पान २ वर

### कोथेरी येथे घराला आग; लाखोंचे नुकसान

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातील कोथेरी वडाचा कोंड येथील घराला आग लागली. सदरची घटना रविवारी सकाळी १० वाजता घडली. आगीमध्ये दगडू शिंदे यांचे सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाले. सुदैवाने लागलेल्या आगीमध्ये जीवितहानी झाली नाही. कोथेरी वडाचा कोंड ग्रामस्थांनी तातडीने प्रसंगवधान दाखवत आग विझवली. त्यानंतर महाड नगर परिषदेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने तातडीने आग लागलेल्या घरावर पाण्याचा फवारा करीत आग आटोक्यात आणण्यास मदत केली.

## रायगडच्या ३०० प्रदुषणकारी एसट्यांना मुंबईत ‘बंदी’



प्रमोद जाधव

**। अलिबाग ।**

**रायगडातील ३०२ एसट्यांनी चार लाख किलोमीटरचा प्रवास केला आहे. त्यामुळे या एसट्यांना मुंबईत प्रवेश दिला जात नाही. मुंबईतील प्रदूषण रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे धूर ओकणाऱ्या या एसट्या रायगडमधील रस्त्यावर धावत आहेत. वायु प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती आहे. त्याकडे महामंडळाने लक्ष देऊन नवीन एसट्या देण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.**

एसटी महामंडळ रायगड विभागात अलिबाग, पेण, कर्जत, महाड, माणगाव, श्रीवर्धन, मुरूड व रोहा असे आठ एसटी बस आगार असून १९ बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४८० एसट्या आहेत. त्यात शिवशाही, निमआराम व साध्या एसट्यांचा समावेश आहे. एसटीतून दिवसाला सुमारे एक लाख प्रवासी प्रवास करीत असून एसटीला दिवसामागे सुमारे ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. शहरी भागासह ग्रामीण भागात खेड्यापाड्यात एसटी धावत असल्याने त्याचा फायदा ग्रामीण भागातील प्रवाशांना, विद्यार्थ्यांना तसेच तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी नोकरी, व्यवसायानिमित्त जाणाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. जिल्ह्यात खासगी वाहनांची संख्यादेखील प्रचंड वाढली आहे. दुचाकी वाहनांसह चारचाकी वाहने खरेदी खरेदीदेखील वाढू लागली आहे. त्यामुळे या स्पर्धेच्या युगात तग धरून ठेवण्यासाठी एसटी वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करीत आहे. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जात आहेत. त्यामुळे एसटीकडे प्रवासी एसटीकडे आकर्षित होऊ लागले आहेत. यातून एसटीला उत्पन्न मिळत आहे. रायगड विभागातील ४८० एसट्यांपैकी ३०२ एसट्यांनी चार लाख किलोमीटरचा प्रवास केला आहे. त्यातून धूर निघत असल्याने या एसटीला मुंबईमध्ये प्रवेश दिला जात नाही. मोठ्या शहरातील प्रदूषण रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या एसटी बसेस जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाठविल्या जात आहेत.

पर्यावरणाचे संवर्धन राखण्यासाठी वेगवेगळ्या सामाजिक संस्था, पर्यावरणाचा संदेश देऊन प्रबोधन करण्याचे काम करीत आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातात. पान २ वर

### ७५ एसट्या चार लाख किमी खालील



**रायगड जिल्ह्यातील ३०२ एसट्यांनी चार लाख किमी प्रवास केल्याने त्या मुंबईमध्ये पाठविल्या जात नाही.त्यामुळे आणखी ७५ एसट्यांची त्यामध्ये भर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या ७५ एसट्यांनी चार लाख किलोमीटरपेक्षा कमी प्रवास केला आहे. त्या लवकरच चार लाख किलोमीटरचा टप्पा पार करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

## काँग्रेसची वंचितला मंत्रिपदाची ऑफर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



जागावाटपाबाबत निर्णय होत नसल्याने वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीमधून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. असे असतांना काँग्रेस पक्षाकडून अजूनही प्रकाश आंबेडकर यांना पुन्हा सोबत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अजूनही आम्ही तुमच्याकडे दोस्तीचा हात पुढं करायला तयार असून, तुम्हाला जागा पाहिजेत तर त्या जागा पण द्यायला तयार असल्याचे म्हटले होते. आता काँग्रेसकडून प्रकाश आंबेडकरांना केद्रात मंत्रिपदाची ऑफर देण्यात आली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीबाबत घेतलेल्या भूमिकेवर बोलतांना वरिष्ठ काँग्रेस नेते अनिस अहमद यांनी म्हटले आहे की, प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत समझोता करायला आजही काँग्रेस पक्ष तयार आहे. काँग्रेस पक्ष प्रकाश आंबेडकर यांना राज्यसभेत पाठवायला आणि केंद्रात मंत्रिपद द्यायला देखील तयार आहे. मात्र, प्रकाश आंबेडकरांनी अकोल्यातून माघार घ्यावी असा प्रस्ताव प्रकाश आंबेडकर यांना देण्यात आल्याची माहिती अनिस अहमद यांनी दिली आहे.

२०१९ मध्ये ही प्रकाश आंबेडकर यांनी दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. मात्र ते पराभूत झाले होते. या वेळेलाही प्रकाश आंबेडकर निवडून येऊ शकत नाही. मात्र, त्यांच्यामुळे बीजेपीला फायदा होईल असे आम्ही त्यांना कळविले आहे. प्रकाश आंबेडकर आमचे मोठे भाऊ असून, ते राज्यसभेत पाठवण्यासंदर्भातल्या आमच्या प्रस्तावाला मान्यता देतील अशी अपेक्षा असल्याचेही अनिस अहमद म्हणाले आहे.

महाविकास आघाडीत सहभागी झालेल्या प्रकाश आंबेडकरांनी लोकसभा निवडणुकीच्या आधीच बाहेर पडण्याचा देखील निर्णय घेतला. महाविकास आघाडीच्या बैठकीत वंचितच्या प्रतिनिधींना मानसन्मान मिळत नसल्याचा आरोप आंबेडकर यांनी केला होता. अनेक बैठकींना आमंत्रण मिळत नव्हते आणि अपेक्षित जागा देखील दिल्या पान २ वर

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ एप्रिल

१) श्रीम. मीनल नंदकुमार डोळस
विद्यानगर, ८-४-१९४९
२) श्री. सीताराम बाळू भगत
वाडगाव, ८-४-१९५३
३) श्री. महेश पांडुरंग वैद्य
अलिबाग, ८-४-१९५०
४) श्री. प्रवीण पितांबर दास शहा
अलिबाग, ८-४-१९५५

# कुडाच्या लेणी पर्यटकांचे आकर्षण

## ■ मांदाड पुलापलिकडील रस्ता खराब असल्याने पर्यटक नाराज

। मुरुड । वार्ताहर ।

जंजिऱ्यापासून सुमारे २५ कि.मी अंतरावर असणाऱ्या कुडा येथील लेणी परिसरातील निसर्ग सौंदर्यामुळे पर्यटकांना तसेच वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य शैलीमुळे प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकांना आकर्षित करतात.

मुंबई - गोवा महामार्गावर मुंबईपासुन १३० कि.मी. अंतरावर आणि माणगावच्या अग्नेय दिशेला २१ कि.मी. अंतरावर असणारे कुडा हे एक शांत खेडेगाव आहे. येथे समुद्रकिनाऱ्याजवळ असणाऱ्या एका टेकडीवर २६ कोरीव गुहांचा समुह असून येथून अरबी समुद्राचे होणारे नितांत रमणीय दर्शन लेण्यांची शोभा अधिकच वाढविते. मुरुडला आलेला पर्यटक खास लेणी पाहण्यासाठी जातो. परंतु आल्यावर पहिली तक्रार करतो कि, मांदाड पुलापुढील १ किमी रस्ता अतिशय खराब आहे व मुख्य रस्त्यावरून लेण्यांकडे जाणारा रास्ता अर्धा किमी खराब असल्याने पर्यटक नाराज आहेत. गेली अनेक वर्ष हे रस्ते बनले नाहीत.



कुडा लेणी बौद्धकालिन लेणी आहेत. माणगाव प्रांतावर महाभोज राजवंशांची सत्ता असताना या लेण्यांची निर्मिती झाली असावी असा कयास आहे. इ.स.१८४८ मध्ये डोंगराच्या कातरीतील या लेण्यांचा शोध लागला. कुडा येथील लेणी दोन टप्प्यात कोरली असून क्रमांक १ ते १५ ही लेणी खालच्या स्तरात तर क्रमांक १६ ते २६ ही लेणी वरच्या स्तरात आहेत. ही सर्व लेणी बौद्धांच्या हीनयान पंथाशी संबंधित आहेत.

ज्यामध्ये स्तुप पूजा प्रचलित होती. कुडाच्या २६ गुहांपैकी ४ चैत्यगृहे आहेत. क्रमशः होत गेलेला विकास दिसून येतो. येथील भिंतीवर आणि खांबांवर असणारे शिलालेख दात्यांची (दान देणाऱ्यांची) माहिती देतात. हा लेण्यांचा सर्व परिसर पश्चिमाभिमुख आहे. समोर अथांग अरबी समुद्र, पूर्वेस तळा, उत्तरेस घोसाळा किल्ला दिसून येतो.

दुमजली लेण्यामध्ये खालच्या लेण्यांपैकी बहुतांशी लेणी प्रेक्षणीय आहेत. एक संघ दगडी डोंगर कोरून निर्माण झालेल्या लेण्या पाहताना आश्चर्यमिश्रीत भाव सहज उमटतात. पावसाच्या तडाख्याने मुख्य लेण्यांच्या प्रवेशद्वारावरील अजस्त्र दगडी हत्ती उध्वस्त झाले आहेत. काही शिलालेख स्पष्ट आहेत. ध्यानधारणा व निवासासाठी असणाऱ्या या लेण्यांखाली तळ्यांमधे पाणी साठवण्याची व्यवस्था आहे. मांदाड बंदरातून व्यापार चालत असल्याची माहिती मिळते.

पुरातत्व विभागाकडून या लेण्यांची हवी तशी स्वच्छता दिसून येत नाही. तथापि मुख्य रस्त्यापासून लेण्यांपर्यंतचा दोन किमी हा रस्ता अतिशय खराब आहे. हा रस्ता दुरुस्त करावा अशी पर्यटकांची मागणी आहे.

# पाळणाघरांतील सुविधा, सुरक्षिततेबाबत नवीन मानके

### महत्त्वाच्या घटकांवर भर

* पाळणाघरात सीसीटीव्ही आवश्यक. पाळणाघर कार्यालयीन जागेत, निवासी सदनिका, सोसायटी, शाळा, रुग्णालय, सहकारी कार्यालय किंवा आवश्यकतेनुसार अन्य जागेत सुरू करता येणार आहे.
* पाळणाघर शक्यतो तळमजल्यावर असावे, पाळणाघराची वेळ चालक आणि पालक यांच्या परस्पर सोईनुसार असावी.
* पाळणाघर स्वच्छतेवर विशेष भर देण्यात यावा.
* दृक-श्राव्य साहित्याबरोबर मुलांच्या वयानुरूप, मुलांचे आकलन वाढवणारी खेळणी असावीत.
* पाळणाघरात प्रथमोपचाराचे साहित्य, पाळणाघरात येणाऱ्या-जाणाऱ्यांची नोंदवही असली पाहिजे.
* पाळणाघर प्रशासन समितीमध्ये किमान तीन मुलांच्या पालकांचा समावेश असणे आवश्यक आहे.

। रायगड । प्रतिनिधी ।

बालकांना सर्वसमावेशक, सुरक्षित वातावरण मिळण्यासाठी केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्रालयाने पाळणाघरांसाठीची मानके जाहीर केली आहेत. त्यात पाळणाघर व्यवस्थापनापासून सोईसुविधा, सुरक्षितता अशा विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्रालयाने पाळणाघरांसाठीची मानके तयार केली. त्यांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्यात एकूण २१ महत्त्वाच्या घटकांवर भर देण्यात आला आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील विकास, महिलांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारे सेवा क्षेत्र यांचा विचार करून पाळणाघर सुरू करणे आणि त्याचे व्यवस्थापन याबाबतचे निकष निश्चित केले आहेत.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दुर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**
**दोन मित्रांकडून, अलिबाग**

# पाच ठिकाणी उष्माघात कक्ष

**पनवेल :** गेल्या काही दिवसांपासून पनवेल तालुक्यात तापमानाचा पारा वाढला आहे. सकाळी ११ नंतर घराबाहेर पडणेही मुश्किल झाले आहे. अनेकांना उष्माघाताचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे लोकांना उष्माघाताचा त्रास होऊ नये, यासाठी पनवेल तालुका आरोग्य विभाग सतर्क झाला असून पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच २४ उपकेंद्रांवर जनजागृती करण्यात येत आहे.

तापमानाचा पारा वाढू लागल्याने जनजीवनावर परिणाम होऊ लागला आहे. उष्म घातामुळे अनेकांना आरोग्याच्या समस्या जाणवत आहेत. तालुक्यात उष्माघातामुळे जीवितहानी झाली नसली, तरी नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी उद्भवत आहेत. तालुका आरोग्य विभागाच्या माध्यमातून आजिवली, आपटा, वावंजे, नेरे, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत असणाऱ्या २४ उपकेंद्रांमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच प्रमुख आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. प्रत्येक कक्षात लागणाऱ्या प्राथमिक गरजाची पूर्तता केली जात असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील नखाते यांनी दिली. उष्माघातापासून खबरदारी म्हणून तालुका आरोग्य विभागाच्या वतीने खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत. पाच प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहे.

# आरटीईची मोफत प्रवेशाची नियमावली जाहीर

। रायगड । प्रतिनिधी ।

आरटीईतील बदलानुसार प्रवेशाची नियमावली शालेय शिक्षण विभागाने अंतिम केली आहे. त्यानुसार पहिलीत प्रवेश घेताना सुरवातीला घरापासून एक किमी अंतरावरील खासगी अनुदानित शाळांची निवड करावी लागेल.त्यानंतर शासकीय तथा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि या दोन्ही प्रकारच्या शाळा तेवढ्या अंतरात नसल्यास स्वयंअर्थसहाय्यिता शाळेचा पर्याय विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे. विद्यार्थ्यांची नोंदणी पुढील आठवड्यापासून सुरू होणार आहे.

आरटीईअंतर्गत शालेय शिक्षण विभागाने शाळांचा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. पण, एखाद्या पालकाला अनुदानित शाळेऐवजी त्यांच्या परिसरातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकेच्या शाळेत मुलाला प्रवेश घ्यायचा असल्यास त्यांना तसाही प्रवेश घेता येईल.ज्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किमी अंतरावर खासगी अनुदानित किंवा सरकारी शाळा नसेल आणि इंग्रजी माध्यमाची स्वयंअर्थसहाय शाळा असल्यास त्यांना त्याठिकाणी प्रवेश घेता येणार आहे. पण, तत्पूर्वी शाळांचे मॅपिंग होईल आणि खरोखरच त्या विद्यार्थ्याच्या घरापासून अनुदानित किंवा सरकारी शाळा नसल्याची खात्री केली जाईल.

अपवादात्मक परिस्थितीत अनुदानित, सरकारी व स्वयंअर्थसहाय शाळा विद्यार्थ्याच्या एक किमी अंतरावर नसेल तर त्या विद्यार्थ्यांना तीन किमी अंतरावरील शाळा निवडता येईल, असेही शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

आरटीईच्या २५ टक्के प्रवेश प्रक्रियेतून अल्पसंख्यांक शाळा वगळण्यात आल्या आहेत. पण, एखादी शाळा पुढील काही वर्षात अल्पसंख्यांक झाल्यास आता आरटीईतून त्याठिकाणी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास इयत्ता आठवीपर्यंत मोफत शिक्षण द्यावे लागेल, असेही या नियमावलीतून स्पष्ट करण्यात आले आहे.गटशिक्षणाधिकारी स्तरावर प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे पडताळणी समिती असेल, महापालिका स्तरावरही अशीच समिती नेमली जाईल.आरटीई प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या पालकाकडे रेशनकार्ड, वाहन परवाना, वीज-टेलिफोन, प्रॉपर्टी टॅक्सचे बिल, आधार किंवा मतदानकार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबूक यापैकी एक पुरावा असावा.भाडेतत्त्वावरील पालकांसाठी दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरार असावा. भाडेकरार अर्ज भरण्यापूर्वीचा असावा व तो ११ महिने किंवा त्याहून अधिक काळाचा असावा. भाडेकराराची पडताळणी होईल आणि त्याठिकाणी पालक राहत नसल्यास प्रवेश रद्द होईल.उत्पन्नाचा दाखला २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षातील असावा. जातीचा दाखलाही जरूरी, दिव्यांग मुलासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा शासकीय रुग्णालयांचे ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र जरूरी.२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी शाळा प्रवेशासाठी बालकाचे वय ३१ डिसेंबरपर्यंत सहा वर्षे पूर्ण आवश्यक आहेत.

# राज्यात क्षयरोग औषधांचा तुटवडा

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये टीबीच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. महाराष्ट्र आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार राज्यात केवळ १५ दिवसांचा साठा शिल्लक आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने याबाबत केंद्राला कळवून औषधांची मागणी केली आहे. केंद्राने स्थानिक पातळीवर औषध खरेदीला परवानगी दिली असली तरी खरेदीत अडचण येत आहे.

त्यामुळे हा औषधांचा साठा संपल्यास रुग्णांच्या उपचारांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात आवश्यक तीन एफडीसीच्या ६६,००० पट्ट्या आणि चार एफडीसीच्या १,५५,५२३ पट्ट्यांचा साठा उपलब्ध आहे. ही दोन्ही औषधे संवेदनशील क्षयरोगाच्या उपचारासाठी महत्त्वाची आहेत. हा साठा पुढील १५ दिवसांसाठीचा आहे.

आरोग्य विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, केंद्र सरकारकडून दर दोन ते तीन महिन्यांनी टीबीच्या औषधांचा साठा आम्हाला मिळतो.



आम्ही त्यांना औषधांचा पुरवठा करण्यास सांगितले आहे.

जिल्ह्यांना आवश्यकतेनुसार स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यासाठी राज्यस्तरावरून १.६३ कोटी रुपये आधीच वितरित करण्यात आले आहेत. मात्र, स्थानिक विक्रेत्यांकडून औषध घेण्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांना अडचणी येत आहेत. याबाबत एका विक्रेत्याने सांगितले की, शेजारील राज्येदेखील अशाच प्रकारच्या टंचाईला तोंड देत आहेत, ज्यामुळे विक्रेते अचानक वाढलेल्या मागणीला तोंड देण्यासाठी संघर्ष करत आहेत.

ही खरेदीप्रक्रिया राष्ट्रीयस्तरावर केंद्रीकृत असल्याचे त्यांनी सविस्तरपणे सांगितले. त्यामुळे जेव्हा एका राज्याला टंचाईचा सामना करावा लागतो तेव्हा इतर राज्यांनाही तोच अनुभव येण्याची शक्यता आहे. आम्हाला छत्तीसगड आणि अगदी गुजरातमधूनही ऑर्डर मिळत आहे.

टीबी कार्यकर्त्यांनी सांगितले की, कोविड महामारीपूर्वी औषधांचा तुटवडा कमी होता; परंतु कोविडनंतर औषध खरेदीसाठी निविदा प्रक्रियेत सातत्याने विलंब होत असल्याने समस्या वाढल्या आहेत. निविदा अंतिम न झाल्यास, शेवटच्या क्षणी राज्य सरकारांना स्थानिक खरेदी करण्यास सांगितले जाते, जे शक्य नाही. कारण सर्व औषधे केंद्राकडून खरेदी केली जातात, म्हणून कोणताही विक्रेता या औषधांचा मोठा साठा ठेवत नाही.

### राज्यातील क्षयरोगाचे रुग्ण

| | | |
|---|---|---|
| २०१९ | : | २,२७,००४ |
| २०२० | : | १,६०,०७२ |
| २०२१ | : | २,००,२४० |
| २०२२ | : | २,३३,८७३ |
| २०२३ | : | २,२७,६४६ |
| २०२४ | : | ४८,३८३ |

# तांबाटी गावाजवळ बसविले गतिरोधक

। खोपोली । प्रतिनिधी ।

पेण -खोपोली रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.रस्ता सुसाट झाल्यामुळे भरधाव धावणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. त्यामुळे रस्ता ओलांडताना अपघात घडत आहेत. तांबाटी ग्रामपंचायतीने सातत्याने गतिरोधक बसविण्याची मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करुन संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत होते.

मंगळवारी भरधाव वेगात येणाऱ्या कारने जोरदार धडक दिल्याने अपघात घडला.अपघ-ातात एकाचा मृत्यु झाला.संरपच अविनाश आमले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर संबंधित विभागाने तातडीने गतिरोधक बसविण्याचे काम सुरू केले आहे.

पेण - खोपोली रस्त्याचे रूंदीकरणामुळे झाल्यामुळे अपघात घडत आहेत.शेकाप नेते शांताराम पाटील यांनी पाठपुरावा केल्यानंतर तांबाटी, किरखंडी, डोनवत आदी ठिकाणी रस्त्यावर डांबरी गतिरोधक बसविण्यात आले आहेत. यामुळे या मार्गावरील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

# कुष्ठरोग निर्मूलनासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमाची गरज

। अलिबाग । प्रतिनिधी ।

व्यापक प्रमाणात जनजागृती करूनही कुष्ठरोगांकडे पाहण्याची समाजाची नजर अद्याप बदलेली नाही. यामुळे कुष्ठरुग्णांना अलिप्तपणाचे जीवन जगावे लागते. कुष्ठपीडितांचा प्रश्न गंभीर असून, जगाचा विचार केल्यास जगातील सर्व कुष्ठपीडितांपैकी भारतात ५८ टक्के रुग्ण आहेत. यावर नियोजनबद्ध उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग निवारण संस्था आणि सहायक संचालक कुष्ठरोग यांच्या संयुक्त विद्यमाने येथील कोकोनट हॉटेल आयव्ही रिसॉर्टच्या सभागृहात कुष्ठरोग जनजागृती आणि मानवाधिकार या विषयावर आधारित ४ व ५ एप्रिल अशी दोनदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा शुभारंभ माजी राज्यपाल राम नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. कुष्ठरोग निर्मूलनासाठी वेगवेगळ्या संस्था कार्यरत आहेत. त्याचबरोबर रुग्णांना सन्मानाची वागणूक मिळावी म्हणून स्वर्गीय बाबा आमटे यांच्यासारख्या आश्रमाची, तर दुसरीकडे शहरासह ग्रामीण भागातील झोपडपट्ट्यांमध्ये राहण्याची व्यवस्था केलेली आहे.

कुष्ठरोगींच्या झोपडपट्टीत असलेल्या वस्त्यांमध्ये पाणी, शौचालये, वीज, पायवाटा, घरांचा दर्जा, शिक्षण, आरोग्य सेवा अशा प्रकारचे अनेक प्रश्न आहेत. अशा झोपडपट्ट्या देशात जवळजवळ ८०० असून, झोपडपट्ट्यांमधील प्रश्न अधिक गंभीर आहेत; तर आश्रमांचे प्रश्न वेगळ्या प्रकारचे आहेत. त्यांना दिले जाणारे काम, व्यवसायासाठी शिक्षण आणि नोकऱ्या इत्यादी प्रश्न आहेत.

जगातील सर्व कुष्ठपीडितांपैकी भारतात ५८ टक्के रुग्ण आहेत. त्यामुळे भारताला कुष्ठरोगाची राजधानी समजले जाते. त्यामुळे देशातील अन्य राज्यांतील कुष्ठपीडितांना एकत्र करून हा प्रश्न आपण दिल्लीच्या व्यासपीठावर नेला; परंतु सध्याच्या अस्थिर परिस्थितीमुळे प्रत्यक्ष या कामास सुरुवातच झाली नसल्याची खंत राम नाईक यांनी यावेळी बोलून दाखविली. याप्रसंगी पनवेल येथील शांतिवन कुष्ठरोग निवारण समितीचे ट्रस्टी उदय ठकार, आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग निवारण संस्थेचे कार्यकारी संचालक शरद भोसले, ट्रस्टी आनंद नवाथे, मानद सचिव मिथिला गोखले आदी उपस्थित होते.

गैरसमज, अज्ञान, कुष्ठरोग लपविण्याच्या प्रकारामुळे कुष्ठरोगाचे रुग्ण शोधताना आशा वर्कर यांना अडचण येत आहे. रायगड जिल्ह्यात आजाराचे रुग्ण कमी झाले असे वाटत असतानाच, दुसरीकडे उपलब्ध माहितीनुसार सर्व्हे अंती रायगड जिल्ह्यात २५ हजार रुग्ण सापडल्याचे आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग निवारण संस्थेचे कार्यकारी संचालक शरद भोसले यांनी सांगितले.

सर्व्हेच्या वेळी कुष्ठरोग वस्तीत जाऊन माहिती घेतली असता, त्यांचे अनेक प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. तसेच कुष्ठरुग्णांमध्ये दोन प्रकार पाहायला मिळतात. शारीरिकबरोबरच मानसिक आजाराचा त्यात समावेश आहे. या दोन्हीपैकी मानसिक आजार खूप कठीण असून, मानसिक आजारामुळे कुष्ठरोगी खचून जातात, असे शरद भोसले यांनी सांगितले.

पान १ वरून

## रायगड पोलीस अग्नीशस्त्रांच्या प्रतिक्षेत

देखील याबाबतचे आदेश मवाळ केल्याने यंदा मोठा बदल झाला. पोलिस आयुक्तांच्या नेतृत्वाखालील समिती कोणाचे शस्त्र जमा करणे बंधनकारक आहे, कोणाला सूट द्यायची याविषयी निर्णय घेते. यासाठी समिती कारणे पाहून निर्णय देते. बँक, सुरक्षारक्षक, खेळाडूंना या नियमातून सूट असते.

## प्रचारातून घटक पक्षाने अंग चोरले?

आयोजित करुन आम्ही युती धर्म पाळत असल्याचा संदेश देण्याचा खटाटोप सुरु केलो आहे. आतापर्यंत झालेल्या मेळाव्यात धैर्यशिल पाटील यांची अनुपस्थिती खटकणारी ठरत आहे. दुसरीकडे शिंदे गटाला राज्यात अपेक्षित जागा मिळेनाशा झाल्या आहेत. उलट शिंदे गटातील विद्यमान खासदारांचे तिकीट कापण्याचा सपाटा भाजपाने अवलंबला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याचे बोलले जाते. महायुतीमध्ये दबाव निर्माण करण्यासाठी प्रचारापासून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दूर राहण्याच्या सूचना दिल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांची डोकेदुखी वाढल्याचे दिसून येते. महायुतीमधील नाराजी नाट्य हे रायगडातील मतदारांमध्ये पोचत असल्याने तटकरेंसाठी हे नक्कीच परवडणार नाही. त्याचा जबरदस्त फटका हा तटकरेंना बसू शकतो.

अनंत गीते हे इंडिया आघाडीतील प्रत्येक घटक पक्षाला सोबत घेऊन मतदारांपर्यंत पोहचत आहेत. संविधान वाचवण्यासाठी इंडिया आघाडीच्या गीते यांना मतदान करा, असे आवाहन विविध सभेमधून करण्यात येत असून त्यांना चांगलाच प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते.

## कॉंग्रेसची वंचितला मंत्रिपदाची ऑफर

जात नसल्याने प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रकाश आंबेडकर यांच्या एकला चलो रे भूमिकेचा सर्वाधिक फटका कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत होणारे हे नुकसान पाहता कॉंग्रेस पक्षाकडून आंबेडकरांची मनधरणी केली जात असल्याचे बघायला मिळत आहे.

## एसट्यांना मुंबईत 'बंदी'

मात्र त्याकडे सरकारचे पाहिजे तसे लक्ष नसल्याचे समोर आले आहे. ज्या बसमधून सर्वसामान्य प्रवासी प्रवास करतात. त्याच बस रस्त्यावर मोठया प्रमाणात धूर ओकत आहे. तरीदेखील एसटी रस्त्यावर धावत असते. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभाग मात्र पर्यावरणाच्या विषयावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील रस्त्यांवर या एसट्या धावत असल्याने वायू प्रदुषणामुळे रायगडकरांच्या जिवाशी खेळ होत असल्याची भिती निर्माण झाली आहे.

## 'सरकारविरोधात कोणीच बोलत नाही'

मात्र, या मतदारसंघातून मी विजयी होणार असल्याचा दावा राजू शेट्टींनी केला आहे. दरम्यान, शेतकरी चळवळीनं तरुणांना अन्यायाच्या विरोधात लढण्यास शिकवले आहे. घामाच्या दामाच्या लढाईमुळे ग्रामीण भागातील अर्थकारण बदलले आहे. यामुळे ग्रामीण भागातील समाज व्यवस्थेवर प्रभाव टाकणारे बदल शेतकरी चळवळीमुळे झाल्याचे शेट्टी म्हणाले. केंद्र व राज्य सरकार शहरी व ग्रामीण असा दुजाभाव करत वेगवेगळी धोरणे राबवत आहे. यामुळं सर्वसामान्य जनतेला याचा फटका बसत असल्याची टिका राजू शेट्टी यांनी बावची येथील जाहीर सभेत केली.

शेतीतील उत्पन्न वाढवायचे असेल तर शेतकऱ्यांना पायाभूत सुविधा, संशोधन केंद्रे , विमा संरक्षण या गोष्टींची उपलब्धता करणे गरजेचे होते असे राजू शेट्टी म्हणाले. देशामध्ये अन्नधान्य खाणारे दोन वर्ग आहेत. एक चवीसाठी व दुसरा पोटाची खळगी भरण्यासाठी. यामुळं जर देशात सेंद्रीय शेतीमुळे उत्पादन कमी झाले तर भुकबळीचे प्रमाण वाढेल असे राजू शेट्टी म्हणाले.

सरकार कराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सामान्य जनतेकडून वसुली करते. मात्र, त्याचा परतावा उद्योगपींची कर्जे राईट ऑफ करण्यासाठी केली जाते ही शोकांतीका असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. सामान्यापर्यंतच्या योजना फक्त कागदावरच असून त्याची जाहीरातबाजी करण्यात येत आहे. देशामध्ये सर्वाधिक उद्योग निर्माण करण्याची क्षमता असलेल्या कृषी, वस्त्रोद्योग व औद्योगीक क्षेत्राकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष झाल्यानेच बेरोजगारी वाढू लागली असल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

## सत्तेत आल्यानंतर संपत्तीचं सर्व्हेक्षण करणार

असल्याचं गांधींनी स्पष्ट केलं.देशामध्ये एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्यकांची संख्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ९० टक्के आहे. परंतु या समाजघटकांना नोकरी नाही आणि मालमत्तेचा समान हक्कदेखील नाही, असं राहुल गांधींनी म्हटलं. ते पुढे म्हणाले, ९० आयएएस अधिकारी देशाचं प्रशासन चालवतात. त्यामध्ये केवळ ३ ओबीसी, १ आदिवसी आणि ३ दलित आहेत. त्यामुळे देशातील नोकऱ्या आणि इतर लोककल्याणकारी योजनांना लोकसंख्येच्या घटकांसाठी वितरित केलं जाईल. त्यासाठी देशातील जनतेने कॉंग्रेसला साथ द्यावी, असं ते म्हणाले.

# अपघातात पती-पत्नीचा मृत्यू

। उरण । वार्ताहर ।

उरण रेल्वे स्थानकासमोर असलेल्या प्रवेशद्वाराला लागुनच असलेल्या रस्त्यावर कारचालकाने स्कुटरला धडक दिल्याने अपघात घडला. घडलेल्या अपघातात स्कुटरवरील पती -पत्नीचा मृत्यू झाला आहे. तर पाच वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाली आहे. अपघात झाल्यानंतरही वाहन चालक जय चंद्रहास घरत रा. म्हातवली, उरण याने उद्धटपणे रेल्वे पोलिस कर्मचाऱ्यांला मारहाण, शिवीगाळ करून घटना स्थळावरुन पोबारा केला आहे.

भीषण धडकेत स्कुटीवर असलेले पवित्र बराल (४०), पत्नी रश्मीता बराल (३४) आणि पाच वर्षीय मुलगी परी असे तिघेही गंभीररीत्या जखमी झाले होते. जखमी पती पवित्र बराल यांचे येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात तर पत्नी रश्मीता बराल यांचे वाशी येथील हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. गंभीर जखमी असलेल्या पाच वर्षीय परीला ठिकाणी ठिकाणी फ्रॅक्चर झाले आहे. तिच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अशी माहिती पोलिसांनी दिली. तर कारचालकाचा पोलीस तपास घेत आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-भिलवले, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| फराद एम. कादरी | ५८ | १/अ | ०-८०-०० | ०-७४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ८/०४/२०२४

खरेदीदारा तर्फ वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

**निवडक**

## इंदापुरात शोभायात्रेचे आयोजन

**माणगाव :** श्रीराम सेवा मंडळ इंदापूरतर्फे गुढीपाडवा व हिंदू नववर्षानिमित्त इंदापुरात मंगळवारी (दि ९) दुपारी ३.३० वा. वाजता भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोभायात्रेचा मार्ग श्री हनुमान मंदिर वरचे इंदापूर येथून प्रारंभ होणार आहे. ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत व श्री हनुमान व गणेश मंदिर येथे ६.०० वाजता महाआरतीने समारोप होणार आहे. तरी सर्वांनी या शोभायात्रेत सहभागी होऊन नववर्षाचे स्वागत करावे असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## मोबाईलसह रक्कम लंपास

**पनवेल :** निलिमा जोशी या गावदेवी मंदिर रोड, पापडीचा पाडा, तळोजा येथे राहतात. त्या सकाळी उठल्यावर त्यांना बेडरूममधील कपाट अर्धवट उघडे दिसले. यावेळी त्यांना कपाटातील साड्यांच्या खाली ठेवलेले पैसे दिसून आले नाही तसेच मोबाईल फोन सुद्धा दिसला नाही. त्यांच्या बेडरूममधील खिडकीतून चोराने मोबाईल आणि रोख रक्कम चोरून नेली. प्रकरणी खारघर पोलीस ठण्यात तक्रार करण्यात आली. त्याचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## मतदान जनजागृती कार्यक्रम

**उरण :** भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वीप उपक्रमाअंतर्गत इक्रा हायस्कूलमध्ये मतदान जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला. कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे आपण मतदानाचा अधिकार बजवायला हवा. मेरा व्होट मेरी पहचान अशी ओळख लोकशाहीच्या सर्वात मोठ्या सणात म्हणजे निवडणुकीत मतदाराने करायला हवी अशा प्रकारची जनजागृती करण्यात आली. यावेळी हायस्कूलचे १६० हून अधिक पालक उपस्थित होते.

## पथदिवे बसविण्याची मागणी

**अलिबाग :** तालुक्यातील कार्लेखिंडीत पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. आधीच जंगल भाग असल्याने काळोखात प्रवास करताना रस्त्याचा अंदाज येत नसल्याने नवख्या वाहनचालकांना चाचपडावे लागत आहे. त्याचप्रमाणे या परिसरातील रस्ता वळणावळणाचा असल्याने अनेकदा वाहनचालकांना समोरील काहीच दिसत नाही. तरी, संबंधित विभागाने या परिसरात पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

## रस्त्याची खड्ड्यांमुळे चाळण

**अलिबाग :** तालुक्यातील कार्लेखिंडमार्गे रेवस रस्त्याची मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करताना वाहनचालकांची पुरती दमछाक होत असून, वाहने नादुरुस्त होण्याचे प्रकारदेखील वाढले आहेत. तरी, संबंधित विभागाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी वाहनचालकांसह प्रवाशांची मागणी आहे.






## पाटील कुटुंबियांचे सांत्वन

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. निधनाची वार्ता कळताच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. रविवारी (दि.७) पेझारी येथे जाऊन जनसुराज्य शक्तीचे डॉ. विनय कोरे, शासकीय अधिकारी किरण पाणबुडे, तसेच राज्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांची भेट घेत सांत्वन केले.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी पाटील कुटुंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगडात रंगीबेरंगी फुलांचा रंगोत्सव

## पर्यटकांची रंगांची उधळण पाहण्यासाठी गर्दी

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

सह्याद्रीच्या डोंगर रांगा, विपुल वनसंपदा लाभलेल्या रायगड जिल्ह्यातील डोंगर रांगा, रस्त्याच्या कडेला, माळरान व जंगल आदी ठिकाणी ज्वाला फुले म्हणजेच पळस, बहावा, कुडा, पांगरा, पिवळा गुलमोहर/सोनमोहोर, उक्षी, कांचन व कटेसावर आदी झाडांना बहर आला आहे. जणूकाही फुलांचा रंगोत्सव येथे सुरू झाला आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांसह निसर्ग अभ्यासक देखील सुखावले आहेत. पर्यटक देखील ही रंगांची उधळण पाहण्यासाठी आवर्जून येथे थांबतात. आणि डोळे भरून विविधरंगी फुलांचा आनंद घेतांना दिसत आहेत.

निसर्गाचा हा चमत्कार पाहणे म्हणजे एक पर्वणीच आहे. विशेषतः पर्यटकांना ही फुले आकर्षित करतात. फुलांनी बहरलेले ही झाडे अनेक पशु पक्षांना खाद्य व आश्रय देतात. त्यामुळे येथे विविध पक्षांचा किलबिलाट असतो. जैवविविधता देखील बहरते. या ऋतूतील विविध आकर्षक फुले निसर्ग व पक्षी अभ्यासकांना ही पर्वणी आहे. हा नजारा पाहण्यासाठी अनेक पर्यटक देखील याठिकाणी निरीक्षणासाठी आवर्जून येत असतात.

### फ्लेम ऑफ द फायर पळस

फ्लेम ऑफ द फायर म्हणून ज्याचे वर्णन केले जाते त्या पळसाची लाल व भगवी फुले खूप बहरली आहेत. डोंगराळ भाग, रस्त्याच्या कडेला आणि शेताच्या बांधावरील पळसाच्या झाडावर आलेली ही भडक लाल भगव्या रंगाची फुले जंगलाला आग लागल्या प्रमाणे भासत आहेत. त्यामुळे यांना ज्वालाफुले असे देखील म्हणतात. एका ब्रिटिश अधिकाऱ्याने या फुलांच्या लालभडक रंगावरून पळसाच्या फुलांना फ्लेम ऑफ द फायर हे नाव दिले आहे.

### भरगच्च बहरलेले गिरीपुष्प

गिरीपुष्प याला ग्लिरिसिडिया असे नाव आहे. हा पानझडी वृक्ष असल्यामुळे पाने गळून गेल्यानंतर फांद्यांच्या टोकांवर निळी जांभळी फुले गुच्छात येतात. फुलांनी बहरलेले गिरीपुष्प झाड फार सुंदर दिसते. या झाडाची फुले शोभेसाठी वापरली जातात. या झाडांच्या बिया उंदरांनी खाल्यास उंदीर मरतात. या झाडांच्या हिरव्या पानांपासून चांगल्या प्रकारचे कंपोस्ट खत तयार होते.

### मनमोहक देवचाफा

देव चाफ्याची फुले पांढरी असून मध्यभागी पिवळसर झाक असते. खोड राखाडी रंगाचे असते व खोडाला पारंब्या असतात. ही फुले किंवा या फुलांचा हार देवाला वाहतात. म्हणून सहसा हे झाड देवळाबाहेर लावलेले दिसते. रस्त्याच्या दुतर्फा सुद्धा दिसतात.

### सोन मोहोराच्या फुलांचा गालिचा

याला पिवळा गुलमोहर किंवा ताम्रशिंपी असे देखील म्हणतात. नाजूक पिवळ्या जर्द पिवळ्या कागदासारख्या पाकळ्यांच्या फुलांमुळे सर्व झाड पिवळेधमक दिसते. झाडाच्या तळाशी गळून पडलेल्या फुलांची आणि पाकळ्यांची सजावट होते. रस्त्यावर पडलेली ही पिवळी फुले जणू काही रस्त्यावर पिवळा गर्द गालीच्या अंथरला आहे याप्रमाणे वाटते. येथून जाणारे वाटसरू व पादचारी यांना ही फुले मनस्वी आनंद देतात.

### पिवळा धम्मक बहावा

पिवळा धम्मक आकर्षक गोल्डन शॉवर म्हणजेच बहावा बहरला आहे. ही लोंबकळणारी पिवळी धम्मक फुले सर्वांचे लक्ष वेधत आहेत. सध्या जिल्ह्यात जंगल, माळरानावर व रस्त्याच्या कडेला बहाव्याची फुलांनी बहरलेली झाडे दिसत आहेत. फुलांच्या सोनेरी रंग हे या वृक्षाचे खास वैशिष्ट आहे. बहावा पावसाच्या आगमनाची चाहूल देतो. फुलांनी बहरल्यावर साधारण ४५ दिवसांच्या आत पाऊस सुरू होतो. एक उपयोगी व सुंदर वृक्ष म्हणून बहाव्याला ओळखले जाते. याचे शास्त्रीय नाव कॅशिया फिस्टुला मराठी नाव बहावा व कर्णिकार हे आहे. तर संस्कृत नाव आरग्वध आहे. इंग्रजी नाव आणि हिंदी नाव अमलतास आहे.





### लालबुंद मखमली पांगारा

पांगारा याच्यावर एकही पान नसताना लाल मनमोहक फुलांनी बहरतो. फेब्रुवारी ते एप्रिल या काळात पांगाऱ्याला फुले येतात. याच्या फुलांना गंध नसतो, मात्र फुलांचा लाल रंग आणि मखमली वाटणाऱ्या पाकळ्या कुणालाही आपल्याकडे वेधून घेतात.

### उक्शी गर्द फुले

झुडपावर उगवलेली उक्शीची गर्द फुले औषधी असतात. ही फुले फिकट व पिवळट हिरवी असून फांद्यांच्या शेंड्यावर परिमंजरीत मार्च-मेमध्ये येतात. रस्त्याच्या कडेला माळरानावर ही झुडपे उगवतात त्यावर प्रचंड दाटीने उक्शी फुले बहरतात.

### चविष्ट सुवासिक कुडाची फुले

पांढरा कुडा किंवा मइंद्रजवफकिंवा 'कुटज' मूळव्याध, रक्तस्राव, अतिसार, आमांश, अग्निमांद्य या विकारांतील आयुर्वेदिक औषधांमध्ये कुड्याचा वापर होतो. १० ते १५ फूट उंच वाढणाऱ्या या झुडुपास प्रत्येक फांदीच्या टोकाशी मंद सुवास असलेल्या पांढऱ्या रंगाच्या फुलांचे गुच्छ येतात. या फुलांची भाजी सुद्धा करतात.

### कांचनची आकर्षक फुले

फुले गुलाबी, पांढरी, फिकट जांभळ्या रंगावर गडद जांभळ्या छटा असलेली आणि सुवासिक असतात. यातील चार पाकळ्या फिकट कोनफळी रंगाच्या व पाचवी पाकळी गडद रंगाची असते. काही फुलांच्या एक किंवा दोन पाकळ्यांच्या मुळाशी पिवळ्या रंगाचे ठिपके सुद्धा आढळतात. ही फुले फारच आकर्षक व मनमोहक दिसतात. कांचन या वृक्षाच्या फुलांचा हंगाम हा डिसेंबर ते मार्च किंवा एप्रिल मध्ये असतो.

### आकर्षक व पशुपक्ष्यांचे अन्नदाते काटेसावरचे फुल

काटेसावरीची फुले मोठी, पाच पाकळ्या, पाकळ्या जाड आणि रंग गडद गुलाबी, खूप सारे पुंकेसर असलेली असतात. या फुलांना खाण्यासाठी खारुताई झाडावर बागडते. तर फुलांमधून मध गोळा करण्यासाठी वेगवेगळ्या पक्ष्यांची मांदियाळी या झाडावर जमा होते.

## यात्रांची मांदियाळी

**। पाली । वार्ताहर ।**

जिल्ह्यात गुढीपाडव्याने एप्रिलमध्ये मोठ्या प्रमाणात यात्रोत्सवांचा धूमधडाका होणार आहे. रामनवमी, हनुमान जयंती, तसेच श्री चंडिका देवी पालखी सोहळा यानिमित्ताने यात्रोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे. बच्चे कंपनीसह पालक वर्ग यात्रोत्सवांची आतुरतेने वाट पाहत आहेत. यात्रोत्सवाची वाट पाहणाऱ्या नागरिकांना दुसऱ्या बाजूला वाढलेल्या तापमानाचा ताप सहन करावा लागणार आहे. या यात्रोत्सवादरम्यानच लोकसभा निवडणुकीचा प्रचार रंगत असल्याने आचारसंहितेची टांगती तलवार राजकीय नेत्यांवर असणार आहे.

# कर्जतमध्ये लवंगी-सातेरी मिरचीची शेती

## दररोज ५० किलो मिरचीची काढणी

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात शेती हा हजारो शेतकऱ्यांचा उदरनिर्वाहाचे साधन बनले आहे. पाण्याची व्यवस्था असलेले शेतकरी हे पाण्याचा वापर करून शेती करतात आणि आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करतात. जिते गावातील शेतकरी कुटुंबाने भाजीपाला शेती केली आहे. मात्र, तब्बल दोन एकर जमीनीवर हिरव्या मिरचीची शेती केली असून दररोज ५०हुन अधिक किलो मिरची विक्रीसाठी काढणी या शेतातून केली जाते. जाधव कुटुंब या आपल्या भाजीपाला शेतीमधून खुष असल्याचे दिसून येत आहे.



तालुक्यातील जिते गावातील शरद जाधव यांची शेती नेरळ कशेळे रस्त्याच्या बाजूला या आहे. या रस्त्याच्या काही मीटर अंतरावरून उल्हास नदी वाहते. या नदीमध्ये बारमाही पाणी असते आणि त्याचा फायदा या भागातील शेतकरी उन्हाळी शेती करतात.शेतीमधून दरवर्षी विविध प्रकारच्या भाज्या आणि पालेभाज्या यांचे उत्पन्न घेणारे जाधव यांनी यावर्षी स्थानिक वडापाव विक्रेते आणि भाजीपाला विक्रेते यांची मागणी लक्षात घेऊन मिरचीची लागवड करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नेरळ येथील कृषी केंद्रातून लवंगी आणि सातेरी मिरची यांची बियाणे आणून रोपे तयार केली. दोन एकर जमिनीवर या रोपांची लागवड वाफ्यांवर केली. त्या वाफ्यांमध्ये पाण्याचे नियोजन केले. मार्च

> आम्हाला दररोज ताजी मिरची लागते आणि हि मिरची आपल्या जवळच्या शेतात आणि ती देखील हिरवीगार तिखट मिळू लागली आहे. त्यामुळे आमच्या बटाटा वड्याला चव देखील वाढली आहे.
> – रोशन पाटील, मालकपाटील वडा

महिन्यापासून मिरचीचे पीक हाती येऊ लागल्यावर शरद जाधव यांनी लवंगी आणि सातेरी मिरचीचे ग्राहक शोधण्यासाठी नेरळ आणि कशेळे येथील बाजारात जाऊन भाजीपाला विक्रते आणि बटाटा वडा विक्रेता यांची भरत घेतली.

हिरवीगार लवंगी मिरची आणि सातेरी मिरची यांचे उत्पन्न पाहून मोठ्या प्रमाणात घाऊक व्यापाऱ्यांनी मिरचीची मागणी केली. दररोज ५० ते ७० किलो मिरचीची विक्री होते. हिरवीगार आणि तिखट अशा मिरचीला बाजारात चांगला भाव मिळत असून जाधव यांच्या शेतात शरद जाधव यांना त्यांच्या पत्नी शारदा जाधव आणि दोन्ही मुले यांची मदत होत असते. गिरीश जाधव आणि गौरव जाधव हे दोघे मिरची काढून बाजारात नेवून विकण्याचे काम करतात तर शरद जाधव पाण्याचे नियोजन करतात. या शेतातून निघणारी मिरची किरकोळ बाजारात १०० रुपये दराने विकली जात आहे, तर होलसेल बाजारात ७० ते ८० रुपये दराने विकली जात आहे. त्यामुळे मिरचीची शेती करण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे.

# ऐनघर ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचे साम्राज्य



**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील सर्वात श्रीमंत समजल्या जाणाऱ्या ग्राम पंचायतीमध्ये जवळपास २ ते ३ वर्षांपासून घंटागाडीचे तीनतेरा वाजले आहेत. त्यामुळे ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या गावांमध्ये सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.

काही वर्षांपूर्वी शासनाने ग्राम स्वच्छता अभियानाचा भाग म्हणून प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये घंटागाडी सुरू करण्यात आली होती. परंतु, ग्रामपंचायतीमध्ये घंटागाडीची सुविधा ही व्यवस्थितरीत्या सुरु असतांना जवळपास २ ते ३ वर्षांपासून ऐनघर ग्रामपंचायतमधील घंटागाडी ही कुठल्याही गावात कचरा जमा करण्यासाठी फिरत नाही.

याबाबतीत अनेक वेळा सरपंच तसेच ग्रामसेवकांशी विचारणा केली असता कधी घंटागाडीमध्ये बिघाड झाला आहे, तर कधी डंपिंग ग्राऊंडची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे घंटागाडी बंद ठेवण्यात आली आहे अशी वारंवार उत्तरे देण्यात आली. त्यामुळे पंचायतीमधील प्रत्येक गावांमधील महिलांपुढे कचरा कुठे टाकायचा हा प्रश्न पडला आहे. त्यामुळे ऐनघर ग्रामपंचायतीमधील प्रत्येक गावात कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याचे चित्र दिसून येत आहे.

> ग्रामपंचायतीमध्ये नविन घंटागाडीचा प्रस्ताव घेण्यात आला असून लवकरच नविन घंटागाडी उपलब्ध करण्यात येईल. डम्पिंग ग्राऊंडची देखिल व्यवस्था उपलब्ध करुन घंटागाडी सुरू करण्यात येईल.
> – सरपंच कलावती कोकळे

# गुढीपाडव्या पार्श्वभूमीवर बांबूला मागणी



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

टिकाऊ, लागवडीचा अल्प खर्च, कमी मशागत, कमी वेळात अधिक उत्पादन आणि उत्पन्न देणाऱ्या बांबूच्या लागवडीकडे अनेकजण वळत आहेत. गुढी उभारण्यासाठी बांबूच्या काठ्यांची विक्री सुरू झाली आहे. त्याचबरोबरच बांधकाम व्यवसाय, मांडव उभारणी, विविध शोभेच्या वस्तू निर्मितीसाठी बांबूला मागणी वाढली आहे. याशिवाय पनवेल व मुंबईसारखी मोठी बाजारपेठ जवळ असल्याने ठिकठिकाणी शास्त्रशुद्धरीत्या बांबू लागवड होत आहे.

### बांबूचे अनेक उपयोग

**बांबुच्या विविध प्रजाती कोकणात उत्तम प्रकारे वाढतात. नवनवीन बांबू उद्योग सध्या येऊ घातले आहेत. पर्यटनासाठी बांबूची घरे, बांबू फ्लोरिंग, बांबू पॅनल, अगरबत्ती, हस्तकला, चारकोल, इथेनॉल आदी साठी बांबू वापरला जातो.**

पालीतील रवींद्र लिमये यांनी आपल्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड केली आहे. गुढीपाडव्यानिमित्त बांबू विक्रीही सुरू आहे. सुधागड तालुक्यातील उद्धर येथील प्रयोगशील शेतकरी तुषार केळकर हे बांबूपासून इको फ्रेंडली घरे तयार करतात आणि याचे प्रशिक्षणही देतात. त्याचबरोबर सुधागड तालुक्यातील गोंदाव माठळ येथील शेतकऱ्यानेही बांबूची लागवडीला पसंती दिली आहे.

### माणगा बांबूला पसंती

**बांबूच्या विविध प्रजाती असून यात माणगा बांबूला अधिक पसंती आहे. हा बांबू भरीव तसेच लवचिक असतो. या बांबूची विक्री मोठ्या प्रमाणात होते. जाड काठीची किंम तही जास्त मिळते. वर्षभर या बांबूला मागणी असते. टोपल्या, फावडे, फर्निचर, हातोडे तयार करण्यासाठी तसेच बांधकाम व्यवसायात त्याचा प्रामुख्याने वापर होतो.**

ढोकशेत येथे सचिन सूर्यकांत टेके व प्रतीक्षा सचिन टेके यांनी साडेचार एकर क्षेत्रामध्ये बांबूविश्व उभारले आहे. याठिकाणी एकूण १३०० हून अधिक बांबूची लागवड करण्यात आली असून मुख्यत्वे माणगा ही प्रजाती व इतर ३४ अनेकविध प्रजातींचे बांबू आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी, बांबू लागवडीकडे वळावे यासाठी टेके निःशुल्क बांबू लागवड परिसंवाद आयोजित करतात. त्यांच्याकडे माणगा जातीचे ४००० रोपे, टुल्डा जातीची ३५०० विविध प्रजातींची बांबूची रोपे उपलब्ध आहेत. पनवेल, मुंबई मार्केटमध्ये चांगल्या दर्जाच्या बांबूला ७० ते ८० रुपये दर मिळतो. लागवडीनंतर चार वर्षांनी बांबू तोड केली जाते.

> बांधकाम व मांडव व्यावसायिक तसेच परांचीसाठी मोठ्या प्रमाणात बांबू खरेदी करतात. गुढीपाडव्यानिमित्त बांबूंना मागणी वाढली असून ८० ते ८० रुपये नग दराने विक्री सुरू आहे. बांबू लागवडीतून चांगले उत्पन्न मिळते.
> – शंतनू लिमये, बांबू उत्पादक, पाली

# भाजप नावाची गँग

किरीट सोमय्या यांनी एका मुलाखतीत केलेल्या अनेक गौप्यस्फोटांमुळे भाजप आणि गुन्हेगारी टोळी यात काही फरकच उरलेला नाही असेच कोणालाही वाटेल. गुन्हेगारी टोळ्यांमध्ये नेमबाज गुंड भरती केले जातात. त्यांना खुनाच्या किंवा खंडणीच्या सुपाऱ्या दिल्या जातात. मारायचे आहे किंवा पैसे उकळायचे आहे तो कोण आहे याच्याशी या गुंडांना मतलब नसतो. त्यांचा मतलब सुपारी वाजवण्याबद्दल मिळणाऱ्या पैशांशी असतो. भाजप हा एक राजकीय पक्ष आहे. देशाची आणि बऱ्याच राज्यांची सत्ता त्याच्याकडे आहे. पण या पक्षाच्या नेत्यांकडून विरोधी नेत्यांच्या सुपाऱ्या दिल्या जातात. त्यांच्यावर आरोप केले जातात. त्यांच्यामागे इडीसारख्या यंत्रणा लावल्या जातात. मग ते एकतर तुरुंगात जातात किंवा भाजपमध्ये दाखल होतात. सोमय्या हे अशा सुपाऱ्या वाजवण्याबद्दल कुप्रसिध्द आहेत. आता मुंबई तक या वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्वतःच हे सर्व काम कसे चालते याबाबत खुली कबुली दिली आहे. शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान मातोश्री म्हणजे माफिया टोळीचा अड्डा झाला आहे असा आरोप सोमय्यांनी केला होता. अशी टीका करायला आपण तयार नव्हतो, मात्र हा पक्षाचा आदेश आहे असे सांगून देवेंद्र फडणवीस यांनीच आपल्याला तसे आरोप करायला लावले असेही त्यांनी सूचित केले आहे. पक्षाने जे जे आदेश दिले ते ते मी शिस्तबद्ध सैनिकांप्रमाणे पाळले असेही ते म्हणतात. याचा अर्थ छगन भुजबळ, अजित पवार, हसन मुश्रीफ यांच्यापासून ते भावना गवळी, मुंबईतले सेनेचे नगरसेवक यशवंत जाधव, आमदार रवीन्द्र वायकर यांच्यावर सोमय्या किंवा भाजपने जे जे आरोप केले तो एका मोठ्या कारस्थानाचा भाग होता हे आता स्पष्ट झाले आहे. विरोधी पक्षांना नष्ट करण्यासाठी त्यांच्या नेत्यांवर बेलगाम आरोप करण्याचे हे तंत्र स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात कोणत्याही पक्षाने वा सत्तेने वापरलेले नाही.

### भाजप नेत्यांची दातखीळ

एरवी विरोधी पक्ष सत्तारुढांवर भ्रष्टाचाराचे आरोप करतात. मिडिया ती प्रकरणे उचलून धरतो व सत्तारुढांवर त्याचा वचक राहतो. पण मोदींच्या भाजपने हे सर्वच चक्र उलटे फिरवले आहे. विरोधकांवर वाटेल तसे आरोप करायचे आणि त्यांच्या मागे कुत्र्यांप्रमाणे सीबीआय किंवा इडीच्या यंत्रणा सोडायच्या असा प्रकार भाजपने सुरू केला. बहुसंख्य वृत्तपत्रे व टीव्ही वाहिन्या यादेखील भाजपच्या दावणीला बांधलेल्या असल्याने त्याही विरोधकांवरच उलटल्या. या काळात भाजपवर झालेल्या आरोपांबाबत मात्र अजिबात चौकशा झाल्या नाहीत. अदानीसोबत मोदींचे संबंध किंवा अलिकडेच निवडणूक रोख्यांच्या बदल्यात कंत्राटे देण्याचे जे प्रकरण उघड झाले आहे त्याबाबत मात्र भाजपच्या नेत्यांची दातखिळी बसली आहे. महाराष्ट्रात व इतर ज्यांच्याविरुध्द आरोप किंवा इडीच्या कारवाया सुरू झाल्या अशा २५ पैकी २३ नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि त्यांच्याविरुध्दचे खटले बासनात गुंडाळून ठेवण्यात आले असा वृत्तांत अलिकडेच इंडियन एक्स्प्रेसने प्रसिध्द केला होता. याबाबत विचारले असता अशा राजकीय तडजोडी कराव्याच लागतात असा निर्लज्ज खुलासा सोमय्या यांनी केला. याचा अर्थ यापैकी अनेक आरोप हे खोटे असू शकतात. गुंडांनी बिल्डरला खंडणीसाठी पिडावे तसे भाजपवाले विरोधकांना या आरोपांवरून केवळ पिडतात. त्यांच्याकडून अपेक्षित खंडणी मिळाली, म्हणजेच ते भाजपमध्ये सामील झाले की या धमक्या बंद पडतात. दुसरीकडे समजा यातील काही भ्रष्टाचाराची प्रकरणे खरी असली तरीही भाजपला त्यांच्याबाबत खरी चिंता आहे असे अजिबात नाही. भ्रष्टाचार या मुद्दयाचा ते केवळ राजकीय वापर करू इच्छितात. एकदा संबंधित नेता भाजपमध्ये आला की त्याच्या भानगडी पडद्याआड केल्या जातात. म्हणजेच भाजपची जनतेशी किंवा देशाशी कसलीही बांधिलकी नाही. भ्रष्टाचार दूर व्हावा अशी वगैरे त्याची काही इच्छा नाही. त्याची इच्छा एकच. सत्ता आपल्या हातात राहायला हवी. हा भीषण सत्तापिपासू पक्ष आहे.

### कारस्थान उघडे

सोमय्या यांनी रायगडात येऊन अनेकदा तमाशे केले. उद्धव ठाकरे यांच्या बंगल्यांचे तथाकथित प्रकरण लावून धरले. कोल्हापुरात हसन मुश्रीफ व वाशीममध्ये भावना गवळी यांच्याविरोधात मोहिम उघडल्याचे दाखवले. पण हा सगळा एक बनाव होता. मुंबईत देवेंद्र फडणवीस आणि दिल्लीतले वरिष्ठ नेते यांच्या आदेशानेच हे सर्व करावे लागले असे सोमय्या यांनी म्हटले आहे. म्हणजे अत्यंत सूत्रबध्द रीतीने मिडिया व सर्व पोलिसी यंत्रणांचा गैरवापर या नेत्यांनी केला आहे. खरे तर या कबुलीनंतर सोमय्या आणि हे वरिष्ठ नेते यांच्यावर या गैरवापराबद्दल खटले भरले जायला हवेत. सध्या सर्व सत्ता यांचीच असल्याने ते होणार नाही. त्यामुळे निवडणुकीतून जनतेनेच त्यांना धडा शिकवण्याची गरज आहे. मुंबई महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजप व सेना वेगवेगळे लढले होते. त्यावेळी उद्धव यांनी युतीमध्ये शिवसेनेची वर्षे सडली अशी टीका केली होती. त्यामुळे उद्धव यांची सेना हाच महाराष्ट्रातला आपला सर्वात मोठा प्रतिस्पर्धी आहे हे भाजपला कळून चुकले होते. त्यातूनच मग ठाकरे, मातोश्री व सेनेचे विविध नेते यांच्यावर आरोपांची राळ उडवण्यात आली. त्यात जे कमकुवत होते ते सेनेतून बाहेर पडून भाजपत दाखल झाले. एकनाथ शिंदे व त्यांचे चाळीस शिलेदार हेदेखील अशाच भीतीतून भाजपच्या गळाला लागले का असा प्रश्न आहे. सचिन जोशी नावाच्या शिंदे यांच्या सहायका विरुध्द इडीची कारवाई होणार असल्याची तेव्हा चर्चा होती. त्यानंतर ही चर्चा व जोशी मिडियातून गायब झाले व शिंदे भाजपसोबत गेले. शिवसेनेला संपवण्यासाठी शिंदे गटाचा वापर करून नंतर फेकून द्यायचे हे भाजपचे डावपेच आहेत. ते लोकसभेच्या जागा वाटपातून पुरेसे स्पष्ट झाले आहेत. गुन्हेगारी टोळ्या बंदुकीच्या धाकावर चालतात. भाजपची टोळी सत्तेच्या बंदुकीच्या आधारे चालते. सत्ता टिकवणे हाच तिचा उद्देश आहे व त्यासाठी ती कोणत्याही थराला जाऊ शकते. सोमय्यांच्या मुलाखतीने या टोळीचे कारनामे उघड झाले आहेत.

**विचार**

# धर्मनिष्ठेचा धगधगता अध्याय 'छत्रपती शंभूराजे'

**वयाच्या अवघ्या बत्तीसाव्या वर्षी हिंदवी स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींवर काळाने झडप घातली. एखाद्या राजपुत्राची इतक्या विकृत पद्धतीने हत्या होणं ही जगाच्या इतिहासातली एकमेव दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. सत्ता,संपत्ती, ऐषआराम या सगळ्यांवर लाथ मारून मराठ्यांचा हा छत्रपती कुणापुढेही न झुकता बेचाळीस दिवस पराकोटीच्या यातना भोगून मृत्यूला कवटाळतो. कशासाठी? आणि कुणासाठी? हा प्रश्न प्रत्येक मराठी मनाने स्वतःला विचारून त्याच्यावर प्रामाणिकपणे चिंतन करण्याची गरज आहे.**



**मिलिंद जाधव**

**ज्यांच्या रक्ताने लिहिली**
**धर्मनिष्ठेची जाज्वल्य गाथा,**
**त्या धर्मवीराच्या चरणी**
**सदैव झूकवू आपला माथा.**

एक फेब्रुवारी १६८९ चा तो दिवस. मुघलांच्या तावडीत सापडलेल्या हिंदवी स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींना घेऊन मुकर्रबखान वाऱ्याच्या वेगाने पेडगावला पोहोचला.नगर जिल्ह्यातल्या पेडगावच्या भुईकोट किल्ल्यात साखळदंडात जखडलेल्या अवस्थेत औरंग्यासमोर शंभूराजांना उभं करण्यात आलं.प्रयत्नांची शिकस्त करूनही मोगली सैन्याला जे शक्य झालं नाही त्या कटकारस्थानाला आपल्याच रक्ताने जन्म दिला.ज्या मनगटावर राखी बांधली त्याच मनगटाने बहीणीचं कुंकू पुसण्याचा दुर्दैवी अध्याय लिहीला.कशासाठी? तर वतनदारीच्या तुकड्यासाठी.आजच्या भाषेत सांगायचं तर केवळ सत्तेसाठी आपल्याच लोकांनी आपल्याच लोकांशी गद्दारी केली होती. आपल्याच रक्ताच्या फंदफितुरीने हिंदवी स्वराज्याचा छावा जेरबंद झाला.मृत्यू समोर दिसत असूनही ताठ मानेने उभ्या असलेल्या मराठ्यांच्या या छत्रपतीसमोर औरंग्या मात्र अंतर राखूनच उभा होता. कारण स्वतःला आलमगीर म्हणवून घेत असला तरी मराठा या शब्दाची धग आणि रग काय असते ते आयुष्यभर तो अनुभवत होता. 'बेटा तुम्हे किसीका डर नही लगता क्या'?आग्र्याच्या दरबारात औरंगजेबाने विचारलेल्या प्रश्नावर 'हुजूर हमे किसीका डर नही लगता बल्की हमारी वजहसे सबको डर लगता है' त्यावेळी नऊ वर्षाच्या शंभू बाळाने दिलेल्या या सडेतोड उत्तराच्या नुसत्या आठवणीने तेवीस वर्षानंतरही औरंग्याची कानशीलं लाल झाली होती. औरंगजेबाची प्रत्येक मागणी मराठ्यांचा छावा धुडकावून लावत होता.इस्लाम कबूल करण्याच्या अटीवर जीवदान देण्याचा औरंगजेबाने दिलेला प्रस्तावही शंभूराजांनी धुडकावून लावला. जेरबंद मराठ्यांचा छत्रपती झाला होता पण आलमगीर म्हणवून घेणारा औरंग्या मात्र चाचपडत होता. जेरबंद झालेला मराठ्यांचा छत्रपती गर्जत होता तर औरंग्या मात्र लाचारी करत होता. मरण समोर दिसत असूनही शंभूराजांच्या चेहऱ्यावरचं तेज आणि बाणेदारपणा बघून 'अरे गिरफ्तार कौन है संभा या मै?' हा सवाल औरंग्या स्वतःलाच विचारू लागला. अखेर हतबल झालेल्या औरंग्याने शंभूराजांचे हाल करायला सुरुवात केली. अंगावर असंख्य वार झाले. हातापायाची नखं उपटून काढण्यात आली. प्रत्येक शिक्षेचा अंमल प्रथम कवी कलशावर करण्यात येत होता. पराकोटीच्या शारीरिक छळाबरोबरच शंभूराजांना मानसिक यातना देण्याची कोणतीच कसर तो सोडत नव्हता.शंभूराजांच्या अंगावर वार घ्यायलासुद्धा जागा शिल्लक राहिली नव्हती. संपूर्ण शरीरातून रक्ताच्या धारा वाहत होत्या. साधारण महिनाभराच्या हाल अपेष्टांनंतर शंभूराजांना आणि कवीकलशांना उंटावर बसवून पुणे जिल्ह्यातल्या तुळापुरला भीमा, भामा, आंद्रा, सुधा आणि इंद्रायणीच्या संगमावर आणण्यात आलं.औरंगजेबाने हत्येचा दिवस ठरवून निवडला तो फाल्गुन अमावस्या अर्थात मराठी वर्षाअखेरची अमावस्या. आणि ठिकाणसुद्धा निवडलं ते हिंदू धर्मामध्ये पवित्र मानलेलं नद्यांचं संगमस्थान. वर्षाअखेरच्या अमावस्येच्या दिवशी नद्यांच्या संगमस्थळावर मराठ्यांच्या छत्रपतीची हत्या केली तर लगेच दुसऱ्या दिवशी अर्थात भविष्यात गुढीपाडवा साजरा करताना त्याचं शल्य कायमच मराठ्यांच्या मनात राहावं या विकृत विचाराने पछाडलेल्या औरंगजेबाने पेडगावच्या किल्ल्यापासूनचं ११२ किलोमीटर अंतर पार करून तुळापूरला नद्यांच्या संगमस्थानावर आणून वर्षाअखेरीच्या अमावस्येला मराठ्यांच्या छत्रपतीची हत्या करण्याचा कट निश्चित केला. त्यानुसार पाच नद्यांच्या संगमाजवळ दोन वधस्तंभांवर दोघांना बांधण्यात आलं. महिनाभर अतिरेकाचा कळस गाठूनही औरंग्या शांत झाला नव्हता. अखेर डोळ्यामध्ये तापलेल्या सळ्या घालून शंभूराजांचे डोळे काढण्यात आले. हात तोडण्यात आले. दोघांच्याही जिभा कापण्यात आल्या. ज्यांच्या एका कटाक्षाने शत्रू चळाचळा कापत होता त्या डोळ्यांच्या फक्त खोबण्या शिल्लक राहिल्या होत्या.ज्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून सरस्वती अवतरत होती ते हात कलम करण्यात आले होते. शंभूराजांच्या पुढ्यात पडलेली तडफडणारी जीभ 'सखी राज्ञी जयती' ला अर्थात त्यांच्या लाडक्या येसूला कधीच साद न घालण्यासाठी कायमची शांत झाली होती.आऊसाहेबांचा शंभू बाळ कधीही परत न येण्यासाठी कायमचा निघून गेला होता. कुणापुढे कधीही न झुकणारं मस्तक धडावेगळं झालं होतं. कित्येक दिवस मरणयातना भोगणारं शरीर निपचित पडलं होतं.भीमा,भामा,इंद्रायणीचा संगम मराठी रक्ताने लाल झाला.वयाच्या अवघ्या बत्तीसाव्या वर्षी हिंदवी स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींवर काळाने झडप घातली.हिंदू नववर्षाची शेवटची अमावस्या प्रत्येक मराठ्याच्या हृदयावर भळभळत्या जखमेचं दुर्दैवी दान टाकून अजरामर झाली.एखाद्या राजपुत्राची इतक्या विकृत पद्धतीने हत्या होणं ही जगाच्या इतिहासातली एकमेव दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. सत्ता,संपत्ती, ऐषआराम या सगळ्यांवर लाथ मारून मराठ्यांचा हा छत्रपती कुणापुढेही न झुकता बेचाळीस दिवस पराकोटीच्या यातना भोगून मृत्यूला कवटाळतो.कशासाठी? आणि कुणासाठी? हा प्रश्न प्रत्येक मराठी मनाने स्वतःला विचारून त्याच्यावर प्रामाणिकपणे चिंतन करण्याची गरज आहे. तरच आपण स्वतःला शंभूराजांचे मावळे म्हणवून घ्यायला लायक राहू. अन्यथा काळसुद्धा आपल्याला माफ करणार नाही. मराठ्यांचा इतिहास पराकोटीच्या शौर्याचा आहे यात दुमत नाही पण फितुरीची बीजं खडकावर पेरली तरी ती जोमाने उगवतात हे अचूक हेरलेल्या प्रवृत्तीने फूट पाडण्यासाठी छत्रपतींच्या महाराष्ट्र भूमीची निवड केली.आज चारशे वर्षानंतर पुन्हा एकदा फुटीच्या शापाने डोकं वर काढलं आहे. आपल्याच माणसांना एकमेकांच्या विरोधात उभं करून गलिच्छ राजकारणाचं शिखर सर करणारी विकृत प्रवृत्ती आज विकट हास्य करत उपकार कर्त्याला तू कोण? असा माजखोर सवाल करत आहे.

अशा परिस्थितीत आपण फितुरीच्या बीजाला आलेलं विषारी फळ व्हायचं की एकीचं बळ दाखवून मराठी मातीचा भगवा जरीपटका पुन्हा एकदा दिल्लीच्या तख्तावर फडकवायचा हे ठरवण्याची ही वेळ आहे. म्हणूनच मराठी माणसा वेळीच सावध हो. तुला वारसा आहे शिवशंभूंच्या शौर्याचा, तुझ्यासमोर आरसा आहे जिजाऊंच्या संकल्पनेचा. तुला आन आहे शंभूराजांच्या धर्मनिष्ठ बलिदानाची. आज मृत्युंजय अमावस्येच्या दिवशी शंभूराजांच्या पवित्र स्मृतीला अनंत कोटी प्रणाम.

**आजकाल**

# मानवतावादी कुटुंबवत्सल मीनाक्षीताई

**श्रीकांत पाटील**



**उष:काल होता होता काळरात्र झाली.**
**आता पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली.**

२८ मार्चची ती रात्र उष:काल घेऊन येईल असे वाटत असतानाच रात्री दोनच्या सुमारास एक अघटीत घटना घडली. मागील दोन वर्षांपासून कर्करोगासारख्या दुर्धर आजाराशी सामना करणाऱ्या शेकापच्या रणरागिणी मानवतावादी कुटुंबवत्सल मिनाक्षीताई त्या काळरात्रीत अंतर्धान पावल्या. आयुष्यभर गोरगरीब, अन्यायग्रस्त शेतकरी, काम गार, महिला वंचित उपेक्षित यांच्या उत्कर्षासाठी अविरत कष्ट घेऊन मशालीप्रमाणे पेटत राहिलेल्या मीनाक्षीताई मानवतावादी असण्याबरोबरच कुटुंबवत्सल होत्या.काही तात्विक मतभेदांमुळे घरी परतलेल्या मिनाक्षीताईंनी आपले माता-पिता, बहिण-भाऊ यांच्याशी उत्तमरित्या जुळवून घेत त्यांचा वैचारिक वारसा जपण्यात सहकार्य केले.आपले वडील एक धुरंधर राजकारणी समाज विकासासाठी अहोरात्र झटणारे विकास पुरुष, भाऊ जयंत पाटील, सुभाष उर्फ पंडित शेठ, राजन पाटील, बहिण सुनंदा तर मातोश्री सुलभा काकू हे सर्व आपले आजोबा क्रांतिकारी ना.ना.पाटील आप्पासाहेब यांच्या समाजहिताचा वारसा जपणारी मंडळी! यांच्या कार्यात त्या तडफेने सहभागी झाल्या. कुटूंब एकसंध ठेवण्यात ताईंचा सिंहांचा वाटा आहे. आंबेपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच म्हणून त्यांची कारकीर्द उल्लेखनीय होती. त्यांचे कार्य एका गावापुरते मर्यादित राहणारे कधीच नव्हते. तालुक्याच्या गावागावातून जनहिताची कामे करीत आपल्या प्रेमळ मनमिळावू स्वभावाने लोकांच्या मनात आपलं स्थान पक्कं केलं. पुढे त्या पंचायत समिती, जिल्हा परिषदेवर निवडून गेल्या. रायगड जिल्हा परिषदेत विरोधी पक्षनेत्या म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. आपला सुपुत्र रा.जि.प.चे माजी उपाध्यक्ष अॅड. आस्वाद पाटील म्हणजे पपूशेठ यांनाही राजकारण, समाजकारणाचे उत्तम धडे दिले. ज्यामुळे आज त्यांची कारकिर्द प्रभावी ठरत आहे.राजकारणाच्या पलिकडे जाऊन त्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता व क्रीडा क्षेत्रातही उत्तम कामगिरी बजावली.आपली स्नुषा सौ.चित्राताई यांच्यावरही त्यांनी चांगले संस्कार केले ज्यामुळे त्यांनी रा.जि.प.अर्थ व बांधकाम सभापती तसेच झेप फाऊंडेशनच्या अध्यक्षा म्हणून खारेपाट महोत्सवासारखे भव्यदिव्य कार्यक्रम यशस्वी झाले. आमदार भाई जयंत पाटील, माजी आमदार पंडिशेठ पाटील, अॅड.राजन पाटील,नृपाल पाटील, सवाई पाटील, सौ.सुनंदा पाटील माजी रा.जि.प.अध्यक्षा सौ.सुप्रियाताई, रा.जि.प.सदस्या सौ.भावनाताई, सौ.निताताई, महिला आघाडी प्रमुख सौ.चित्रलेखा, आंबेपूर सरपंच सौ.सुमना पाटील या सर्वांवर सारखेच प्रेम केले.पाटील कुटुंबातील सर्वच नातवंडांवर त्यांचे अपार प्रेम होते त्यांनी तर सर्व सामान्य माणसावरही खुप मनापासून प्रेम केले. त्यातर प्रेमाचा सागर होत्या! त्यांच्या रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात रामनारायण पत्रकार भवन साकारले. समस्त पत्रकारितेसाठी त्यांचं कार्य अवर्णनीय आहे.अनेक क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या त्या मार्गदर्शिका होत्या. मीनाक्षीताईंची राजकीय कारकीर्द खरी बहरली ती विधानसभेत! वक्ता दश सहस्रेशू म्हणतात ते खरं आहे. आपले दादा स्व.प्रभाकर पाटील आणि काका म्हणजे महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते अॅड. दत्ता पाटील यांच्या अभ्यासपूर्ण बुलंद आवाजातील भाषणांनी गाजलेल्या सभा डोळ्यासमोर ठेवून केलेल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी! १९९५ पासून सलग तीन वेळा आमदार होऊन १९९९ मध्ये स्व.विलासराव देशमुख यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात मत्स्य, बंदरे व खारभूमी विकास खात्याच्या राज्यमंत्री म्हणून त्यांची कारकिर्द विशेष उल्लेखनीय ठरली. या काळात त्यांनी संबंधित खात्याअंतर्गत अनेक विकासकामे केली. पक्षनिष्ठा पाळत त्यांनी मंत्रीपदाचा त्याग केला होता.शेकापचे राजकारण सत्तालोलूप कधीच नव्हतं.अवघ्या देशाने पाहिलेला विधानसभेतील एक बाका प्रसंग म्हणजे मनसेच्या आमदारांनी समाजवादी पक्षाच्या अबू आझमी यांना भाषण करताना रोखले असताना तेथे हाणामारीचा प्रसंग उद्भवला होता. अशावेळी अबू आझमींच्या रक्षणार्थ केवळ शेकापची रणरागिणी मीनाक्षीताई झाशीच्या राणी सम सरसावल्या होत्या.

ताई जशा झुंजार रणरागिणी होत्या, तशाच हळव्या अंतःकरणाच्या मानवतावादी होत्या.१९८० मधील प्रसंग सकाळी आमच्या घरासमोरुन त्या रस्त्याने चालत जात होत्या. मी त्यांना सहज म्हटले ताई आमच्याकडे. या माझ्या विनंतीला मान देत त्या घरात आल्या. माझ्या आईने त्यांचे स्वागत केले. आईने चहाचे विचारले मात्र चहाऐवजी त्यांनी टोपातल्या उकडलेल्या वालाच्या शेंगा स्वतः उचलून खाणे पसंत केले. त्या मंत्री असताना माझ्या भावाला एसटीच्या नोकरीतून कमी केले असताना त्याला नोकरीत पुन्हा घेण्यासाठी मी ताईंकडे मंत्रालयात गेलो होतो. त्यांनी मला त्यांच्या सी ६ या शासकीय निवासस्थानी नेऊन जेवण दिले होते व माझ्या भावाचे काम केले होते. माझ्या आई-वडिल यांच्या निधनसमयी त्या माझ्या घरी आवर्जून उपस्थित होत्या.माझ्या मुलीच्या लग्न हळद समारंभात आपल्या सूनबाई सौ.चित्राताई, सौ.चित्रलेखाताई व नणंद सौ.भावनाताई यांच्यासह आवर्जून उपस्थित होत्या.१९९९ साली आमच्या मागणीनुसार अलिबाग येथील कावेरी हौसिंग सोसायटीसह संपूर्ण चेंढरे ग्रामपंचायत परिसरात पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले.भाई आणि ताईंच्या प्रयत्नाने चेंढरे परिसरात रस्ते, पाणी, वीज व गटार व्यवस्था पूर्णत्वास आली.

ताई गेल्याचे मला सकाळी कळले आणि धक्काच बसला. टी.व्ही., व्हाट्सअॅप, फोनवरून कळले.पायाला फ्रॅक्चर असल्यामुळे बेडरेस्ट घेत होतो पण राहवले नाही. सगळ्यांचा विरोध झुगारून पनवेल-कामोठ्यातून ताईंच्या अंत्यदर्शनासाठी आलो. ताईंचे असे अचानक जाणे मनाला घोर लाऊन गेले. ताईंच्या जाण्याने रायगड सून्न झाला नव्हे अख्खा महाराष्ट्र हळहळला. म्हणून जवळपास सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख नेते, मंत्री महोदय, आमदार, खासदार यांनी निवडणुकीच्या रणधुमाळीतही पेझारी येथे येऊन स्व.ताईंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली व पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले. अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवूनी जाती. ताईंना भावपूर्ण श्रद्धांजली

**मराठी साहित्यिक दिनविशेष**

### आठ एप्रिल

**१८४४:-** 'विविधज्ञानविस्तार' या नियतकालिकाचे मालक-संपादक पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांचा जन्म. विविध ज्ञानविस्तारमधून नामांकित ग्रंथांची भाषांतरे करुन ती प्रसिध्द केली. सतत २५वर्षे त्यांनी या मासिकाचे संपादन करुन मराठी साहित्याच्या विकासाला आणि महाराष्ट्राच्या वाड्:मयीन अभिरुचीला वळण लावण्याचे कार्य केले. **१८७४:-** लेखक मंगेश कमलाकर नाडकर्णी यांचा जन्म. त्यांची पुस्तके मुख्यत: धार्मिक विधिविद्यासंबंधीची आहे. गो. स. सरदेसाई यांच्या सहाय्याने त्यांनी 'विवाह-विधिसार' आणि 'अन्तेष्टिविधिसार' ही पुस्तके वेदमंत्राच्या अर्थासहित लिहिली. याखेरीज 'उपनयनविधिसार, श्राध्दविधिसार, आन्हिक कर्मप्रकाश' इ. पुस्तके नाडकर्णी यांनी लिहिली. याशिवाय त्यांचा 'ए शॉर्ट हिस्टरी ऑफ मराठी लिटरेचर' हा प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंतचा मराठी वाड्:मयाचा चरित्रपर आणि विदयेनपर असा इंग्रजी इतिहास ग्रंथ लिहिला आहे. **१९२४:-** कथाकार, माधव दत्तात्रय नावडीकर यांचा जन्म. 'तेचि पुरुष भाग्याचे', 'प्रातिथिअस' हे कथासंग्रह त्यांचे प्रसिध्द झाले आहेत. **१९२४:-** कुमारगंधर्व म्हणजेच शिवपुत्र सिध्दरामय्या यांचा जन्म. शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीत असा भेद न मानता त्यांनी अभिजात संगीताची निर्मिती केली. त्यांनी लिहिलेला 'अनुपरागविलास' हा मराठी ग्रंथ त्यांच्या ह्यातीत प्रसिध्द झाला होता. **१९२८:-** विविध वर्तमानातून २०० हून अधिक पत्र लिहिणारे पत्रलेखक लक्ष्मण वाघ यांचा जन्म. वर्तमानपत्रातून विविध विषयांवर त्यांचे लेखही छापून आलेत त्यावर आधारीत एक पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे. **१९२८ :** चरित्र कादंबरीला रंजक वळणे देऊन लोकप्रियतेची शिखरे गाठणारे ऐतिहासिक कादंबरीकार स्वामीकार रणजित देसाई यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला. शालेय वयातच त्यांनी लेखनाला सुरुवात केली. मॅट्रिक पास आणि इंटर नापास असलेल्या रणजित देसाईनी प्रसाद मासिकाने आयोजित केलेल्या कथा स्पर्धेत पारितोषिक मिळवले. कालांतराने रुपमहाल, कणव, जान, कातळ, गंधाली, कमोदिनी, आ-लेख, मधुमती, मोरपंखी सावल्या अशा सामाजिक आशयाच्या आणि ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेल्या कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. तथापि मराठी साहित्यात रणजित देसाई गाजले ते ऐतिहासिक कादंबरीकर म्हणूनच. बारी, माझा गाव या कादंबऱ्या नंतर साठच्या दशकात माधवराव पेशवे यांच्या जीवनावर त्यांच्या स्वामी या कादंबरीने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. या कादंबरीतून माधवराव व त्यांची पत्नी रमा यांच्या नात्यांना देसाईंनी वेगळी परिमाणे दिली.




त्यानंतर छत्रपती शिवाजी ।। महाराजांवर लिहिलेल्या 'श्रीमान योगी' या कादंबरीही इतिहास घडवला. कर्णाच्या जीवनावर बेतलेली 'राधेय' ही आणखी एक लक्षवेधक कादंबरी. बाजी प्रभूच्या जीवनावर पावनखिंड, राजा रविवर्मा अशा अनेक ऐतिहासिक, पौराणिक कादंबऱ्या लिहून देसायांनी अशा प्रकारच्या कादंबऱ्यांचे युग स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण केले. देसाई यांनी नाट्यसाहित्यावर आपला ठसा उमटवला गरुड झेप, रामशास्त्री, स्वरसम्राट तानसेन, हे बंध रेशमाचे, कांचनमृग, धन अपुरे, वारसा अशा विविध प्रकारच्या नाटकांनी याशिवाय, नगिन, रंगल्या रात्री अशा सवाल माझा ऐका या चित्रपटांचे पटकथा लेखन त्यांनी केले. याखेरीज स्नेहाधरा, मी एक प्रेक्षक असे लेख संग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. ७ मार्च १९९२ रोजी या महान साहित्यिकाचे निधन झाले. **१९७५:-** लोकप्रिय गीतकार, निरनिराळ्या नियतकालिकांचे संपादक, कवी, लेखक, पत्रकार राजा बढे यांचे निधन. 'कोंडिबा' या नावाने स्तंभलेखन करणाऱ्या राजा बढे यांनी 'रायगडाचा राजबंदी' या माहितीपटाची निर्मिती केली. याशिवाय 'हसले मनी चांदणे', 'क्रांतीमाला मखमल' आदी गीतसंग्रह प्रसिध्द. **१९९८:-** महानुभाव पंथाचे गाढे अभ्यासक साहित्यिक, समीक्षक व नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु विष्णू भिकाजी कोलते यांचे निधन. तेराव्या शतकातील सांकेतिक लिपीतून महानुभावांचे एकादशस्कंध, वस्त्रहरण, स्थानपोथी आदी ग्रंथ त्यांनी मराठीत आणले. लीळाचरित्राचेही पुस्तक निघाले, पण प्रसृत झाले नाही. 'प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर' या ग्रंथातून त्यांचा इतिहासाभ्यासक पैलू दिसला.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# उमेद्वारांच्या प्रचारात रिपाइं कार्यकर्त्यांनी फिरवली पाठ

## महायुतीचे सुनील तटकरे, श्रीरंग बारणे यांचे टेन्शन वाढणार?

। पाली/बेणसे। वार्ताहर।

लोकसभा निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले आहे. रायगड आणि मावळ लोकसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगतोय. मावळ मतदारसंघातून शिंदे गट शिवसेनेचे उमेद्वार श्रीरंग बारणे निवडणूक रिंगणात पुन्हा उतरले आहेत, तर रायगडमध्ये महायुतीचे सुनिल तटकरे निवडणूक लढवीत आहेत. महायुतीच्या उमेद्वारांनी प्रचारास सुरुवात केली असली तरी महायुतीतील महत्वाचा घटक पक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टीला दोन्ही उमेद्वार विश्वासात घेत नाहीत, मानसन्मान देत नाहीत. बेरोजगार तरुणांना नोकऱ्या रोजगार देण्यात देखील अपयशी ठरले आहेत. दरवेळी निवडणुकीत फक्त मतांसाठी गोंजारतात, नंतर दूर करतात, अशी नाराजी रिपाई जिल्हा कार्यकारणीच्या बैठकीत नाराज कार्यकर्त्यांद्वारे करण्यात आली. महायुतीच्या मावळ व रायगड लोकसभा



उमेद्वाराच्या प्रचारात जोपर्यंत मान-सन्मान मिळत नाही तोपर्यंत प्रचारात सहभागी होणार नाही अशी भूमिका घेण्यात आली. भाजपचा मित्रपक्ष म्हणून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी नेहमीच सहयोगाची भूमिका बजावली आहे. पुन्हा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना विराजमान करण्यासाठी कामाला लागावे असे आदेश रामदास आठवले यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी दिले. मात्र, या बैठकीत यावेळी संपूर्ण रायगड जिल्ह्यातील मुख्य पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, शहर अध्यक्ष व कार्यकर्त्यांनी महायुतीचे उमेद्वार आणि अन्य घटक पक्षाचे पदाधिकारी आपल्याला मान-सन्मान देत नाहीत, कोणत्याही प्रचार नियोजनात सहभागी करून घेत नाहीत, असा नाराजीचा सुर कार्यकर्त्यांनी आवळला आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना रिपाइं रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर महायुतीचा मित्रपक्ष म्हणून रिपाइंची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

महायुतीचे मावळ व रायगड लोकसभा उमेद्वारांकडून कार्यकर्त्यांना मान-सन्मान मिळत नसल्याची खंत यावेळी व्यक्त केली. सर्व पदाधिकाऱ्यांनी समस्यांचा पाढा वाचला. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायावर भाष्य केले. मत घेणार, निवडून येणार नंतर कार्यकर्त्यांचा विसर पडतो, हे योग्य नाही. कोणताही निधी आम्हाला मिळत नाही. आमच्या प्रत्येक कार्यकर्त्यांना न्याय मिळाला पाहिजे. अन्यथा निवडणुकीच्या प्रचारात आम्ही उपस्थित राहणार नाही. तटकरे यांनी शिष्टमंडळाला सन्मानाने बोलवावे. तसे त्यांनी बोलवले नाही तर यासंदर्भात रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची भेट घेऊन यासंदर्भात कार्यकर्त्यांच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहचविणार आहोत असे सांगण्यात आले. त्यानंतर रामदास आठवले यांच्या पुढील आदेशानुसार भूमिका घेणार असल्याचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. रिपाइं रोहा तालुका अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी ही निवडणुकीत रिपाइं कार्यकर्त्यांचा फक्त वापर करून घेतला जातो, गरज सरो आणि वैद्य मरो ही भूमिका आम्ही यापुढे चालू देणार नाही. रिपाइंच्या या आक्रमक भूमिकेमुळे महायुतीचे उमेदवार सुनिल तटकरे आणि श्रीरंग बारणे यांचे टेन्शन वाढणार का? हेच पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# मावळात बारणेंची मदार भाजपवर

। पिंपरी । वृत्तसंस्था ।

मावळ लोकसभा मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक शिवसेनेचे उमेद्वार खा. श्रीरंग बारणे यांना भाजपचे घाटाखालील म्हणजेच उरण, कर्जत व पनवेल येथील आणि घाटावरील म्हणजेच पिंपरी, चिंचवड व वडगाव मावळ या मतदारसंघातील मित्रपक्षाचे विशेषतः भाजपचे कार्यकर्ते कितपत काम करतात यावरच बारणेंची 'हॅटट्रीक' अवलंबून असणार आहे.

मावळात तिसऱ्यांदा बारणे यांना उमेद्वारी मिळण्यापूर्वी हा मतदारसंघ शिंदे गटाला व बारणेंना देण्यास भाजपचे माजी मंत्री संजय उर्फ बाळा भेगडे यांनी उघड भूमिका घेतली होती. तत्पूर्वी भाजपच्या मावळच्या कोअर समितीच्या दोन बैठकांतही बारणे यांना



विरोध केला होता. भाजपलाच ही जागा द्यावी, अशी स्पष्ट भूमिका बाळा भेगडे, चिंचवडच्या आ. अश्विनी जगताप, पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष शंकर जगताप आदी भाजप नेत्यांनी घेतली होती.

उमेदवारी मिळाल्यानंतर बारणे यांनी आ. जगताप, शंकर जगताप व बाळा भेगडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. ६) पुण्यात पिंपरी चिंचवड शहर व मावळ विधानसभा मतदारसंघाची बैठक घेऊन प्रचाराला सुरुवात केली. यावेळी मावळ भाजपाचे भाऊ गुंड आदी उपस्थित होते. मावळ भाजप तालुका प्रचार प्रमुख रवी भेगडे यांनीच फक्त सकारात्मक भूमिका घेतल्याचे समजते. अन्य कार्यकर्त्यांनी मात्र प्रचाराला अद्याप सुरुवात केलेली नाही. मावळात महायुतीच्या बारणेंविरोधात आघाडीतर्फे शिवसेना ठाकरे गटाचे संजोग वाघेरे अशी लढत असताना पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादीतील अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून असलेल्या वाघेरे यांचा नवा चेहरा तर; दोन वेळा खासदार असल्याने मित्रपक्षात असलेली नाराजी, अशा वातावरणात बारणे यांची मदार भाजपवरच असल्याचे दिसून येत आहे.

## माढ्यासाठी पाडव्याचा मुहूर्त

**सातारा :** सातारा लोकसभेच्या उमेद्वारीचा सस्पेन्स महायुती व आघाडीने कायम ठेवला आहे. महायुतीकडून उदयनराजे भोसले यांच्या घोषणेबाबत कोणतेही संकेत दिलेले नाहीत. आघाडीकडून काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण किंवा राष्ट्रवादीचे आ. शशिकांत शिंदे यांच्यापैकी एकाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. माढासाठी राष्ट्रवादीकडून शरद पवार यांनी संजीवराजे निंबाळकर व धैर्यशील मोहिते-पाटील यापैकी एकाच्या नावावर एकमत करण्याची संधी दिली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची सुरुवात होण्यास सहा दिवस बाकी आहेत. त्यामुळे येत्या मंगळवारी होणाऱ्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावरच उमेद्वारांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

## अशोक हिंगे रिंगणात

**बीड :** बीड लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आता जवळपास महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. यात हळूवार इतर पक्ष देखील आपले उमेद्वार जाहीर करताना पाहायला मिळतात. मात्र, भाजपने सगळ्यात पहिले पंकजा मुंडे यांची उमेद्वारी जाहीर केल्यानंतर तब्बल २० दिवसांपेक्षा अधिक काळ इतर पक्षांनी घेतला. मुंडेंसमोर नेमका कोणता उमेद्वार तग धरणार. यासाठी प्रत्येक पक्ष हा उमेदवारासाठी संघर्ष करत होता. आघाडीतून बजरंग सोनवणे तर दुसरीकडे मुंडे यांच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे हिंगे यांना उमेद्वारी देण्यात आली आहे.

## सांगलीवरून मविआत रस्सीखेच

**सांगली:** आघाडीत सांगलीच्या जागेवरुन शिवसेना ठाकरे पक्ष-काँग्रेसमध्ये जुंपली आहे. त्याच पार्श्वभूमीवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. सांगलीतून विशाल पाटील यांना राज्यसभेवर पाठवण्यात येईल असा प्रस्ताव शिवसेना ठाकरे गटाकडून देण्यात आला. विशाल पाटलांना संसदेत पाठवण्याची जबाबदारी आमची असे वक्तव्य राऊतांनी केले आहे. सांगलीच्या जागेसाठी असून उमेद्वारीवरून काँग्रेस, शिवसेना ठाकरे पक्षात संघर्ष सुरू आहे.

## शरद पवार यांच्या पक्षाचे काम करणार

**जळगाव :** नाथाभाऊंची भारतीय जनता पक्षात घरवापसी झाली; तरीही मी मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातच राहणार आहे. या पक्षातच थांबून संघर्ष करणार आहे, असे एकनाथ खडसे यांच्या कन्या व शरद पवार यांच्या पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मी याच पक्षात आहे, भविष्यातही याच पक्षात राहणार आहे असल्याचे सांगितले.

# बारामतीत बैठकांवर जोर

। बारामती । वृत्तसंस्था ।

महायुतीतील भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या तीन घटक पक्षांमधील जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सोडला आहे. या पक्षाने येथून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली आहे. इंदापूर, दौंड आणि खडकवासला विधानसभा मतदारसंघात भाजपचे प्राबल्य आहे. यापैकी इंदापूर तालुक्यातील भाजप



नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे पूर्वी नाराज होते. परंतु, उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांची नाराजी दूर केली. त्यानंतर फडणवीस यांनी इंदापूरमध्ये घेतलेल्या सभेत हर्षवर्धन पाटील उपस्थित होते. त्यानंतर पाटील यांनी प्रचारास सुरुवात केली आहे. दौंडचे आ. राहुल कुल, भाजपचे वासुदेव काळे यांनी प्रचारास सुरूवात केली. दौंडचे भाजपचे नामदेव ताकवणे, बारामतीतील चंद्रराव तावरे व सतीश काकडे प्रचारास सक्रिय झालेले नाहीत. शिवसेनेचे शिंदे गटाचे माजी मंत्री विजय शिवतारे हेही अद्याप सक्रिय झालेले नाहीत. माजी खा. प्रदीप रावत यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या बुथ प्रमुखांची समन्वय बैठक घेतली आहे. त्यामुळे खडकवासलातील अस्वस्थता काहीशी कमी झाली आहे.

# कल्याणमध्ये नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष

। ठाणे । वृत्तसंस्था ।

ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारीवरून भाजप-शिवसेना शिंदे गटातून दावे-प्रतिदावे सुरू होते. अखेर कल्याण मतदारसंघातून डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मात्र, भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांच्या समर्थकांनी बैठक घेऊन शिंदे यांचा प्रचार न करण्याची भूमिका घेतल्याने महायुतीत मिठाचा खडा पडला आहे. त्यामुळे शिवसेना



आणि भाजपचे वरिष्ठ नेते ही कोंडी कशी फोडतात, याकडे लक्ष लागले आहे.

निवडणूक जाहीर होण्याआधी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी तीन-चार वेळा कल्याण मतदारसंघाचा दौरा केला. तेव्हापासूनच या मतदारसंघात भाजप निवडणूक लढवणार अशी चर्चा सुरू झाली होती. ठाणे, कल्याणच्या जागेवर भाजपने दावा केला. मंत्री रवींद्र चव्हाण आणि श्रीकांत शिंदे यांच्यात बिनसल्याची चर्चा होती. त्यानंतर भाजप आमदार गणपत गायकवाड यांच्या गोळीबार प्रकरणामुळे मित्रपक्षांतील वाद शिगेला पोहोचला होता. आ. गायकवाड हे शिवसेना पदाधिकाऱ्यांवर गोळीबार केल्याने तुरुंगात आहेत. त्यांच्या समर्थकांनी नुकतीच बैठक घेत डॉ. शिंदे यांचा प्रचार करणार नसल्याचे जाहीर केले. दरम्यान, शिंदे गटाच्या नेत्यांनीही डॉ. शिंदे यांचा अपप्रचार करून गणपत गायकवाड यांना जामीन मिळेल, अशा भ्रमात त्यांच्या गुंड प्रवृत्तीच्या समर्थकांनी राहू नये, असा इशारा दिला. भाजपने युतीत खोडा घालणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाने केली आहे. त्यामुळे भाजपचे नेते काय भूमिका घेतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# विश्वजित यांची शिष्टाई ठरली निष्फळ

। मुंबई । वृत्तसंस्था ।

सांगली लोकसभा मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला यावा यासाठी गेल्या काही दिवसांपासून प्रयत्न करणारे डॉ. विश्वजित कदम यांनी काँग्रेसश्रेष्ठींकडे केलेली शिष्टाई फारशी यशस्वी झालेली नाही. याबाबत प्रदेशाध्यक्ष व काँग्रेस प्रभारींशी चर्चा करावी, असे सांगून काँग्रेस अध्यक्षांनीच यातून अंग काढून घेतले आहे. या मतदारसंघात ठाकरे गटाने महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेद्वारी



दिली आहे. कदम यांनी मात्र हा मतदारसंघ काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला आपल्याकडेच राहावा असा आग्रह धरला होता. यासाठी काही दिवसांपूर्वी दिल्लीत येऊन त्यांनी पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेतली. परंतु काँग्रेसश्रेष्ठींनी त्यांना कोणतेही ठोस आश्वासन दिले नाही.

# नाशिकमध्ये घडामोडींना वेग

। नाशिक । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीचे बिगूल वाजले आहे. महायुतीकडून अनेक लोकसभा मतदारसंघात उमेद्वारांच्या नावाची घोषणा देखील करण्यात आली आहे. मात्र, अजूनही काही जागांचा तिढा कायम आहे. त्यामुळे अद्याप तिथे उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आलेली नाही. नाशिक लोकसभा मतदारसंघामध्ये महायुतीकडून राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना तिकीट मिळणार असल्याची चर्चा आहे. मात्र, दुसरीकडे ही जागा शिवसेनेचीच आहे, असा दावा हेमंत गोडसे यांनी केला आहे. त्यामुळे या जागेचा तिढा अजूनही सुटू शकलेला नाही आहे.



दरम्यान, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाचे नेते बबन घोलप हे देखील मुंबईला रवाना झाले आहेत. ते मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यापूर्वी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना ठाकरे गटाचे नेते मिलिंद नार्वेकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नार्वेकर कोण आहेत? त्यांचे ऐकून मला पक्षातून बाहेर काढले. नार्वेकर यांच्यामुळे अनेकजण पक्ष सोडून गेले. मी शिर्डी लोकसभा मतदारसंघात पक्ष वाढवला. मात्र, अचानक मिलिंद नार्वेकर यांचे ऐकूण मला काढण्यात आले. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन शिंदे पुढे जात आहेत. यापुढे मी त्यांच्यासोबत काम करणार असल्याचे घोलप यांनी म्हटले आहे.

# कडूंचा काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा

। मुंबई । वृत्तसंस्था ।

अमरावती लोकसभा मतदार संघात महायुतीविरोधात भूमिका घेणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी महायुतीवर आणखी एक प्रहार केला आहे. अमरावतीमध्ये भाजप उमेद्वार नवनीत राणा यांच्याविरोधात प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांना उमेदवारी दिली आहे. कडू त्यासाठी जोमाने प्रचाराला लागले आहेत. राणा यांच्यावर रोज तीव्र शाब्दीक हल्ले करत आहेत.



रामटेकमध्ये काँग्रेसचे उमेद्वार बर्वे यांना पाठिंबा कडू यांनी दिला आहे. यामुळे महायुतीत सर्व अलबेल नसल्याचा संदेश पुन्हा गेला आहे. राणा यांना उमेदवारी दिल्यावरुन कडू नाराज आहेत. त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन पक्षाच्या कार्यकर्त्यांची भावना मांडली. प्रसंगी महायुतीतून बाहेर पडू पण राणांसाठी मत मागणार नाही, असे कडू यांनी म्हटले होते. राणा यांना उमेद्वारी दिल्यावरून नाराज असलेल्या कडूंनी आता रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेसला समर्थन जाहीर केले आहे.

# शिरूरमध्ये संयुक्त प्रचाराची प्रतीक्षा

। शिरूर । वृत्तसंस्था ।

लोकसभा मतदारसंघ महायुतीच्या वाट्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांना आला असून पक्षाने माजी खा. शिवाजीराव आढळराव पाटील यांना उमेद्वारी दिली आहे. या मतदारसंघातील भाजप नेते प्रदीप कंद, राहुल पाचर्णे (दोघेही शिरूर विधानसभा), आशा बुचके -जुन्नर, अतुल देशमुख -खेड हे नेते आणि जुन्नरचे शिवसेनेचे शिंदे गट माजी आ. शरद सोनवणे हेही अद्याप फारसे सक्रिय झालेले दिसत नाहीत.

भाजपचे अतुल देशमुख आणि आशा बुचके हे दोघे तर उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बोलाविलेल्या समन्वय बैठकीला अनुपस्थित होते.

भोसरीचे आ. महेश लांडगे आणि हडपसरचे माजी आ. योगेश टिळेकर हे दोघेही अद्याप सक्रिय झालेले नाहीत. आढळराव पाटील हे हडपसर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार चेतन तुपे यांच्याशी जवळीक साधत असल्याने टिळेकर अद्याप तटस्थ आहेत. भाजपचे जिल्हाध्यक्ष (उत्तर विभाग) शरद बुट्टे पाटील यांनी मात्र, महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारास सुरवात केली आहे. सध्या भाजप नेते केवळ महायुतीतील घटक पक्षाच्या समन्वयक बैठकांना हजेरी लावणे पसंत करत आहेत. घटक पक्षांतील नेत्यांनी अद्याप संयुक्त प्रचार सुरू केलेला नाही. दरम्यान, या मतदारसंघात चौथ्या टप्प्यात मतदान असल्यानेही प्रचारास सुरुवात झाली नसल्याची चर्चा आहे.

## रामटेकमध्ये भाजपची प्रतिष्ठा पणाला

नागपूर : रामटेक मतदारसंघात महायुतीने शिवसेनेचे राजू पारवे लढत असले तरी भाजपने ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. प्रचाराची सर्व सूत्रे भाजपने आपल्या हाती घेतली असल्याने शिवसेना शिंदे गट व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे कार्यकर्ते नाराज आहेत.शिवसेना-भाजप युतीत हा मतदारसंघ शिवसेनेकडे होता. आतापर्यंत पाच निवडणुकांमध्ये येथून शिवसेनेचा उमेदवार निवडून आला आहे.

# भिवंडीत महायुतीमध्ये धुसफूस सुरुच

। ठाणे । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री शिंदेंचा जिल्हा असलेल्या ठाणे ग्रामीण भागातील बहुतांश जिल्हा परिषद, पंचायत समित्यासह शेकडो ग्रामपंचायती शिवसेनेच्या ताब्यात असल्यानं शिंदे गटाच्या शिवसेनेचं वर्चस्व आहे. त्यातच भाजपाचे उमेदवार केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या निष्क्रियतेला आमचा विरोध असून असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे ठाणे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांनी म्हटले. भिवंडी लोकसभा मतदारसंघामध्ये कुठल्याही परिस्थितीत उमेदवाराला मदत



करणार नाही. पाटील यांनी ग्रामीण भागात शिवसेनेचं खच्चीकरण केलंय. त्यामुळं आमच्या पक्षाचं खच्चीकरण करणाऱ्या भाजपाच्या उमेदवाराला विरोध असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

मारुती धिर्डे यांनी भाजपाचे उमदेवार कपिल पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले. मागील १० वर्षात मतदारसंघाच्या विकासाकडे कपिल पाटील यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलंय. हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च केल्याचा दावा केला जात असला तरी तो निधी विकासकामांमध्ये दृश्यस्वरुपात पहायला मिळत नाही, असाही आरोप ठाणे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांनी केला आहे. महायुतीच्या जागा वाटपात भिवंडी लोकसभा मतदारसंघ मागील दोन वर्षाच्या पंचवार्षि प्रमाणे याही वर्षी भाजपाच्या ताब्यात गेल्यानं शिवसैनिकांमध्ये अस्वस्थता पसरली.

# माढ्यात रामराजे-रणजितसिंहांची प्रतिष्ठा पणाला

। माढा । वृत्तसंस्था ।

**माढा लोकसभा मतदारसंघातील उमेद्वारी जाहीर करण्यावरून महायुतीमधील घटक पक्षांतील नेत्यांमध्ये चांगलाच कलगीतुरा रंगला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर व भाजपचे खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवली असून, फलटण तालुक्यात कोण ठरणार बाहुबली? याबाबत विविध तर्कवितर्क लढविले जात आहेत.**



२०१९ मध्ये निवडून आलेल्या खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी आपल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत आपल्या मतदारसंघातील प्रलंबित पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांसाठी निधीच्या तरतुदी करून घेऊन एकेक प्रकल्प मार्गी लावत फलटण, माळशिरस, माण, खटाव, कोरेगाव, सांगोला, माढा, करमाळा आदी तालुक्यांतील शेतीच्या पाण्याचा प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावला.

सद्य:स्थितीत महायुतीत असतानाही रामराजे यांनी उघडपणे खासदार रणजितसिंह यांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. रणजितसिंहांना संसदेऐवजी घरचा रस्ता दाखविण्यासाठी त्यांनी दंड थोपटले आहेत. त्यातच त्यांच्या गटाच्या गोपनीयपणे बैठका सुरू झाल्या असून, खासदार रणजितसिंह यांना पराभूत करायचेच, यासाठी चंग बांधला आहे. दुसरीकडे खासदार रणजितसिंह यांनीही मतदारसंघातील पाच आमदार आपल्या बाजूने असल्याचे दाखवून दिले आहे. मात्र, धैर्यशील मोहिते-पाटील यांनी खासदारांच्या विरोधात दंड थोपटले असून, निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविली आहे. लोकसभेची ही निवडणूक राजकीय अस्तित्वाची ठरणार आहे. हा निकाल पुढील निवडणूक निकालांवर परिणाम करणारा ठरणार असल्याने रामराजे नाईक-निंबाळकर व रणजितसिंह नाईक-निंबाळकर या दोघांनीही ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवली आहे.

# शिर्डीत बेबनाव नाही, मदार भाजपवरच

**शिर्डी :** शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून विद्यमान खा. सदाशिव लोखंडे हे निवडणूक लढवत आहेत. तथापी भाजपचे शिवसेना उमेद्वाराकडे लक्ष आहे. या जागेची जबाबदारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांकडे आहे. त्यांनी विधानसभा मतदारसंघनिहाय भाजपच्या संघटनात्मक जबाबदारी असलेले पदाधिकारी व बुथ प्रमुखांच्या बैठका सुरू केल्या आहेत. लवकरच ही यंत्रणा सक्रिय होईल असे दिसते. लोखंडे हे भाजपच्या प्रचारयंत्रणेसाठी आग्रही आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची अजित पवार गटाची येथे फारशी शक्ती नसली तरी कोपरगाव विधानसभा मतदारसंघात आ. आशुतोष काळे हे त्यांच्या गटाचे आमदार आहेत. अन्य ठिकाणी मात्र पदाधिकारी केवळ व्यासपीठावर दिसतात. येथे शिंदे गटाचे संघटनात्मक अस्तित्व फारसे नाही. ते भाजप म्हणजे पर्यायाने विखे पाटलांच्या यंत्रणेवर अवलंबून आहेत.

निवडक

## सानपाडा येथे वृक्षारोपण

**सानपाडा :** एप्रिल महिन्यात लोकांना एप्रिल फुल बनविन्यापेक्षा एक झाड़ लावुन निसर्ग थंड करा. या संकल्पनेतुन हरियालीचे व सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारूती कदम यांच्यावतीने सानपाडा सेक्टर ७ येथील स्व. सिताराम मास्तर उदयानात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर, उध्दव ठाकरे शिवसेना गटाचे विभागप्रमुख अजय पवार, शाखाप्रमुख दत्तात्रय कुरळे, मराठा विकास प्रतिष्ठानचे सहचिटणीस ज्ञानेश्वर जाधव, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## मोफत नेत्र तपासणी

**कोलाड :** रोहा तालुक्यातील वारकरी संप्रदायाचा वारसा लाभलेल्या श्री संत सेवा मंडळ खांब पंचक्रोशीतील श्री क्षेत्र नडवली येथे अखंड हरिनाम सप्ताहचे औचित्य साधून या परिसरात तसेच कोलाड विभागात सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या कोलाड लायन्स क्लबच्यावतीने येथे मोफत नेत्र तपासणी आणि मोती बिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याला येथील रुग्णांनी भरभरुन प्रतिसाद देत असंख्ये भाविकांनी याचा लाभ घेत डोळ्यांची तपासणी केली.

## हरिनाम सप्ताह

**कोलाड :** जिल्ह्यात रोहा तालुक्यातील श्री संत सेवा मंडळ खांब पंचक्रोशीची वारकरी संप्रदायाची वैभवशाली परंपरा लाभलेल्या पंचक्रोशीतील यजमान श्री क्षेत्र नडवली येथे गेली सात दिवस चालत असलेला हा अखंड हरीनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अखंड हरिनाम सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार यांचे अलौकिक मार्गदर्शनातून मंत्रमुग्ध होऊन याचा भक्तिमय वातावरणात भक्तगणांनी आनंद लुटला.

## बुथकॅम्प कार्यशाळा

**रसायनी :** पिल्लई एचओसी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये बुथकॅम्प कार्यशाळेचे दि. ४ व ५ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी वाधवानी फाऊंडेशन व नोडेल सेंटर पिल्लई एच ओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरीग अँड टेक्नॉलॉजी प्रशिक्षकांचे म ार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी डिझाईन थिंकिंग, बिसनेस मॉडेलिंग आणि एंटरप्राईज प्लॅनिंगवर गहन अनुभवात्मक प्रशिक्षण घेण्यासाठी आयोजन केले होते.

## ग्रामस्थ आक्रमक

**वावोशी :** ग्रामसडक योजने अंतर्गत भैरव आवंढे खांडपोली ते कामथेकरवाडी असा रस्ता मंजूर झाला आहे. हा रस्ता आधीपासूनचाच राजिपचा डांबरी रस्ता असून त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. काही ठराविक अधिकाऱ्यांना हाताशी धरून काम तथेकर वाडीच्या रस्त्याला लागून असलेल्या दहा पंधरा फार्महाउस मालकानी त्यांच्या सोयीसाठी हा रस्ता आवंडे फाट्यावरून कट करून कामथेकर वाडीकडे वळविला असून याच्या विरोधात ग्रामस्थ खांडपोली गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

# खोरा बंदरात अजब गजब प्रकार




**। कोर्लई । वार्ताहर ।**

**मुरुड तालुक्यातील खोराबंदरातील अजब गजब प्रकार पहायला मिळत आहे. एम.एम.बी.चा स्थानिक भुमीपुत्रांवर अन्याय होत आहे. या अन्यायामुळे १९ जणांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून बोटीसाठी काढलेल्या कर्जाचा हप्ता भरणार कसा, असा सवाल स्थानिक भूमिपुत्रांना पडला आहे.**

मुरुड तालुक्यातील खोराबंदरात पर्यटकांची गर्दी वाढत आहे. या ठिकाणी जंजिरा किल्ला पाहण्यासाठी देश विदेशातून पर्यटक येत आहेत. त्यामुळे काही बाहेरच्या लोकांनी संधी साधून या ठिकाणी फेरी बोट सेवा सुरु केली आहे. पर्यटकांची वाढती रेलचेल पाहता या बोट मालकांनी एकाच्या दोन, दोनचे तीन असे करत चार-चार बोटी सुरू केल्या आहेत. अजुनही काही बाहेरच्या लोकांनी संधी साधून या ठिकाणी बोटी सुरू केल्या आहेत. अशा आता एकूण सात बोटी सुरू आहेत.

खोराबंदर येथील स्थानिक भूमिपुत्रांनी याठिकाणी फेरी बोट सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला होता. त्यासाठी लागणाऱ्या सर्व कायदेशीर बाबी परवाने मिळवून एक नवीन बोट तयार केली आहे. या बोटीचे दोन मार्च रोजी श्रीफळ वाढवून उद्घाटनही करण्यात आले होते. परंतु, या बंदर अधिकाऱ्यांचा वरदस्त लाभलेल्या बाहेरील बोट मालकांच्यामुळे स्थानिक बोटमालकांना याठिकाणी संधीच देण्यात आलेली नीही. सध्या पर्यटकांचे प्रमाण कमी असल्याने बाहेरून आलेल्यांना आधी संधी दिली जात आहे.

आज ज्या चार बोटिंना संधी देण्यात येते त्याच बोटींना दुसऱ्या दिवशी संधी देण्यात येत आहे. त्यामुळे त्याच्यानंतर शेवटला आहेत त्यांना कधीच संधी मिळत नाही. त्यामुळे या बोटीवर काम करणारे खलाशी व बोट बनवणारे स्थानिक भूमिपुत्र अशी एकूण १९ जणांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

नंबर मिळत नसल्याने स्थानिक भूमिपुत्रांनी २२ मार्च रोजी एमएमबीच्या अलिबाग कार्यालयात जाऊन उपसंरक्षक तथा प्रादेशिक बंदर अधिकारी कॅप्टन सी.जे. लेपांडे यांना विनंती केली की, गेले महिनाभर आम्हाला संधीच मिळत नाही. तरी सर्वांना राऊंड पद्धतीने करण्यात यावे. जेणेकरून सर्वांना नंबर मिळेल. या विनंतीला मान देऊन लेपांडे यांनी त्याच दिवशी एक एप्रिलपासून राऊंड पद्धतीने फेरी बोट सुरू करण्याचे पत्रद्वारे खोराबंदर अधिकारी यांना कळविण्यात आले होते. एक तारखेला आपल्याला नंबर मिळेल या आशेने स्थानिक भूमीपुत्र आनंदात असताना अचानकपणे कुठेतरी माशी शिंकली व अचानक दिलेल्या आदेशाला स्थगिती देण्यात आल्याचे कळविण्यात आले. याचे कारण ही अजब गजब देण्यात आले. आचारसंहिता असल्यामुळे राऊंड पद्धतीने फेरीबोट सुरू करता येऊ शकत नाही, असे कळविण्यात आले.

आचारसंहिता व पर्यटक फेरीबोट यांचा कुठेही काडीमात्र संबंध नसताना हे कारण दिल्यामुळे स्थानिक भुमीपुत्रांवर एम.एम.बी. ने मोठा अन्याय केल्याची चर्चा असून या व्यवसायावर अवलंबून असलेल्या १९ जणांच्या कुटुंबावर गेले महिनाभर अन्याय करुन उपासमारीची वेळ आणली आहे. याला सर्वस्वी एम. एम. बी चे अधिकारी जबाबदार असल्याचे बोलले जात आहे.



## विजय कोकणे यांना डॉक्टरेट

**। रसायनी । वार्ताहर ।**

डॉ. विजय हिरामण कोकणे संचालक जन शिक्षण संस्थान रायगड यांचा गोवा येथे 'कॅम्ब्रीज डिजिटल युनिव्हर्सिटी विद्यापीठ' द्वारा दक्षिण गोवा येथे आयोजीत आंतरराष्ट्रीय दिक्षांत सोहळा पार पडला.

या कार्यक्रमप्रसंगी महिला सक्षमीकरण व ग्रामीण विकास समाजकार्य लेखन व संशोधनासाठी त्यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली. याप्रसंगी गोवा राज्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत, युरो आशिया विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सेबॅस्टियन मेंडेस, वेंकटेश्वर मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू ललित कुमार सागर, ग्लोबल युनिव्हर्सिटी ऑफ बोस्टनचे प्रेसिडेंट संजीब कुमार बनिक, पद्म पुरस्कार विजेते डॉ. रोशन पालेवार, ऑल इंडिया कौन्सिल फॉर फिजिकल थेरपीचे अध्यक्ष डॉ. मानिकांत, अजिझ शेख यांच्याहस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन डॉ. विजय हिरामण कोकणे यांना सन्मानीत करण्यात आले.

## पेणमध्ये स्त्री अस्मितेची गुढी

**। पेण । वार्ताहर ।**

चैत्र महिन्याची चाहूल लागली की, मराठी नवीन वर्षाची सुरुवात होते. गुढीपाडवा महाराष्ट्रातील चैतन्याचा सण. या सणाला स्त्री अस्मितेचे प्रतीक म्हणून साजरा करण्याची प्रथा गेल्या १२ वर्षांपूर्वी पेण शहरात सुरु आहे. महिला अत्याचाराविरोधी मंच व अंकुर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पेण येथे महात्मा गांधी वाचनालयात सार्वजनिकरित्या महिला वाजतगाजत मिरवणुकीद्वारे गुढी उभारतात. याकरीता विविध स्तरातील महिला वाजत गाजत गुढी जुन्या रायगड बाजारापासून महात्मा गांधी मंदिरातपर्यंत नेत असतात.

याबाबत नुकतीच डॉ. वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक झाली. यावेळी डॉ. नीता कदम, खैसर मुजावर, दीपश्री पोटफोडे, स्वाती मोहिते, कविता पाटील, शैला धामणकर, ज्योती राजे, संयोगीता टेमघरे, अ‍ॅड. वैशाली कांबळे आदी मंचाच्या सदस्य उपस्थित होत्या.

या कार्यक्रमामध्ये सर्व स्तरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे यावेळी डॉ. वैशाली पाटील यांनी सांगितले आहे. तसेच, दरवर्षीप्रमाणे प्रत्येक धर्मातील एक महिला, मोलकरीण, मतिमंद आदींद्वारे गुढी उभारली जाईल. महिला मंचाच्यावतीने पेणमधील महिलांनी या रॅलीला सकाळी ९:३० वाजता जुन्या रायगड बाजाराजवळ उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

## विश्वनिकेतनमध्ये मोफत आरोग्य शिबीर



**। रसायनी । वार्ताहर ।**

पाताळगंगा औद्योगिक परिसरातील कुंभीवली येथील विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविदयालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा १५० पेक्षा जास्त नागरिकांनी लाभ घेतला.

विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियांत्रिकी विभाग, माधवबाग व टाटा मेमोरियल सेंटर यांच्या संयुक्त उद्यमाने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा मुळ उद्देश म्हणजे रोजच्या धकाधकीच्या जीवनात सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्याकडे होत असलेल्या दुर्लक्षापासून सजग करणे आणि बाहेर उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या महागड्या चाचण्यांचे नियोजन मोफत करून देणे.

या शिबिरात मोफत बीपी, शुगर, ईसिजी, शरीराचे वजन आणि उंचीनुसार असावे लागणारे वजन, पल्स ऑक्सिमीटर मार्फत हृदयाच्या ठोक्यांचे निदान, कॅन्सर सारख्या रोगाचे वेगवेगळ्या चाचण्यांमार्फत निदान करण्यात आले. शिबिरात १५०हून अधिक नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.



● मुरुड परिसरात कोळी बांधव मासेमारीचा शेवटचा हंगाम सुरू आहे. सध्या लहान कोळंबी मिळत आहे. सकाळी कोळी बांधव ताजी कोळंबी बोटीवर निवडताना दिसत आहे. पुढील दिवसात कोळंबी जास्त मिळण्याची शक्यता आहे. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## शांताबाई भगत यांचे निधन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

शांताबाई शांताराम भगत यांचे सोमवारी (दि.१) वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. आपल्या रुपाने संगीत भजनाच्या सेवेसाठी धडपडणारी भजन सेविका हरपल्याचे जनसामान्यांमधून बोलले जात आहे. तसेच, माणसातील माणुसकीची नाती जपणारी एक बहुआयामी, प्रेमळ व मनमिळाऊ, अध्यात्मिक विचार, धार्मिक आचारण व समाज सेव स्वभाव अशा विविध पैलूंनी समृद्ध असे व्यक्तिमत्व होते.



शांताबाई भगत यांना संगीत भजन क्षेत्राची खूप आवड होती. त्या मोठे शहापूर गावातील गणपतीच्या मंदिरात एकादशी निमित्ताने महिलांना एकत्र घेउन भजनाचा कार्यक्रम करत असतं. त्यातूनच पुढे आदर्श महिला भजन मंडळ मोठेशहापूरची स्थापना झाली. त्यांचे या भजन मंडळ निर्मितीत अमूल्य योगदान होते. त्यांनी या माध्यमातून शहापूर गावचा आध्यात्मिक वारसा जपला होता. तसेच, शांताबाई भगत यांनी मंडळाच्या माध्यमातून बचत गटाची स्थापना केली होती. त्यांचा अध्यात्मिक योगदानासोबतच सामाजिक राजकीय प्रवास ही मोलाचा होता. तसेच, शांताबाई भगत या शेतकरी कामगार पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या व एक वेळ ग्रुप ग्रामपंचायत शहापूरच्या सदस्या ही होत्या. त्यांच्या जाण्याने भगत परिवार व माठे शहापूर शोकाकूल झाले आहेत.

## मुरुडमध्ये पर्यटकांची संख्या तुरळक

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने याठिकाणी शनिवार-रविवार शेकडो पर्यटक ये-जा करत असतात. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून पर्यटक समुद्रकिनारी न फिरकल्याने सर्वत्र शांततेचे वातावरण आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या परिक्षा संपल्या तरी मुरूडच्या समुद्रावर पर्यटकांची वर्दळ नसल्याने सर्व हॉटेल व लॉजिंग व्यवसाय, टपरीधारक, घोडेस्वार, घोडागाडी व बाईकस्वार रिकामे बसून आहेत. त्यामुळे संपूर्ण व्यवसाय ठप्प झालेले आहेत.

याबाबत व्यावसायिक मनोहर बैले यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मुरुड समुद्रकिनारी पर्यटक अल्पप्रमाणात येत असल्याने स्थानिक व्यावसायिकांवर परिणाम होत आहे. मागील महिन्यात मुलांच्या परिक्षा असल्याने पर्यटक कमी येत होते. आता मुलांच्या परिक्षा संपल्या असून पर्यटकांची गर्दी होईल अशी अपेक्षा होती. परंतु, हा शनिवार व रविवार कोरडा गेला, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.



## सांडपाण्यावरुन पती-पत्नीला मारहाण

**। रसायनी । वार्ताहर ।**

सांडपाणी नाल्यात सोडल्याच्या रागातून पती पत्नीला मारहाण केल्याची घटना रसायनीमधील लाडीवली गावात घडली.

लाडीवली येथे राजेश कालेकर हे सांडपाणी नाल्यामध्ये सोडण्यासाठी गेले होते. त्या गोष्टीचा राग हरिश्चंद्र धर्मा कालेकर आणि साहिल रामचंद्र कालेकर यांना आला. त्यांनी राजेशला शिवीगाळी करून हाताबुक्याने मारहाण केली. पतीला होत असलेली मारहाण पाहून राजेशची पत्नी रचना या सोडविण्याकरिता आल्या असता त्यांनासुध्दा धक्काबुक्की करून शिवीगाळी केली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सचिन चौरे करीत आहेत.

## जमिनीच्या वादातून लाखांची तोडफोड

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

कोळखे थांब्यासमोर असलेल्या जागेत अल्पेश जाधव हा पूर्वीपासून राहत असून शेजारीच हॉटेल व्यवसाय करत आहे. मात्र, काही दिवसांपूर्वी ती जागा रोहन म्हात्रे याने जगदाळे नावाच्या व्यक्तीकडून विकत घेतल्याचे समजताच अल्पेश जाधव व रोहन यांच्यात बाचाबाची झाली. याचा राग मनात धरून रोहन व त्याच्या साथीदारांनी अल्पेश जाधव व घरातील सर्व सदस्य बाहेरगावी गेल्याची खात्री करून जेसीबी अंगणात घुसवून घराची व हॉटेलची तोडफोड करून लाखोंचे नुकसान केले. याबाबत रोहन म्हात्रेसह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अध्यक्षपदी रामचंद्र सपकाळ यांची नियुक्ती

**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

कुणबी समजोन्नोती संघ मुंबई संलग्न ग्रामीण शाखा रोहा तालुका स्तरावर अध्यक्ष शिवरामभाऊ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शंकरराव म्हसकर, सुरेश मगर यांच्या प्रमूख उपस्थीत माजी आमदार स्व. पा.रा.सनाप कुणबी भवन येथे सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत तालुका पातळीवर नव्याने नियुक्त्या करण्यात आल्या असुन रोहा तालुका कुणबी समाजाच्या अध्यक्षपदी नव्याने रामचंद्र सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली. तर, सरचिटणीसपदी सतीश भगत यांच्यासह उपाध्यक्षपदी मारूती खांडेकर, अनंत थिटे, राजेंद्र शिंदे, रघुनाथ करंजे, गुणाजी पोटफोडे, संतोष खेरटकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी शिवराम शिंदे, शंकरराव म्हसकर, सुरेश मगर, शंकर भगत, रामचंद्र सपकाळ, अमित मोहिते, महेश बामुगडे, दत्ताराम झोलगे, निवास खरीवले, आदी उपस्थीत होते.



## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अकाऊंटंट पाहिजे- जीएसटी बील व रिर्टनस्चा कमीत कमी २ वर्षे अनुभव असावा. प्रत्यक्ष भेटा. संपर्क ९६२३१११४६०. एम.जे. एन्टरप्रायजेस, ब्राह्मण आळी, अलिबाग.

● अलिबाग व जवळच्या भागातील दर महिन्यास ३०० नग सोललेले नारळ पाहिजेत. मोबाईल : ९८६७१११७०५

● फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१

● पॅकिंग, कटिंग, चेकिंग तसेच शिवणकामासाठी महिला मुली पाहिजेत. संपर्क : ९०११२९३१२१, ७२१९३०८००६

● भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## माथेरानमध्ये पर्यटकांचा शुकशुकाट

### मंदीने मोडले व्यावसायिकांचे कंबरडे



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

सध्या सुरू असलेल्या परीक्षांमुळे माथेरानमध्ये मंदीचे सावट असून गेल्या महिन्यापासून पर्यटकांची संख्या रोडवल्यामुळे व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. येथे वर्षभर मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. परंतु, मागील महिन्यांपासून पर्यटकांची कमालीची घट झाल्याने व्यापारी वर्ग चिंतेत आहेत. त्याचा फटका येथील हॉटेल व्यवसायिक, स्थानिक व्यावसायिक, लॉजधारक, हातरिक्षा चालक व अश्वचालक यांना बसला आहे.

एप्रिल-मे महिन्यात पर्यटन हंगाम असतो. त्यासाठी दुकानदारांनी आपल्या दुकानात कर्ज काढून माल भरून ठेवलेला आहे. त्यांची व्याजाची रक्कम निघणे अवघड झाले आहे. तर, हॉटेल मॅनेजमेंटमध्ये नोकरांचा पगार हॉटेलचा खर्च निघत नसल्याचे बोलले जात आहे. तसेच, माथेरानमध्ये वीज, पाणी व शासकीय दर खूपच जास्त आहेत. ते भरताना स्थानिकांची दमछाक होत आहे. हातावर पोट असलेले हात रिक्षाचालक व घोडेवाले यांना भाडे मिळत नसल्याने त्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही व्यावसायिकांकडून पर्यटकांची होत असलेली दिशाभूल पाहता माथेरानचा पर्यटन व्यवसाय एक दिवसावर येऊन ठेपलेला आहे. सकाळी येऊन संध्याकाळी परत जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ झाल्याने स्थानिक नागरिक आपला रोजगार गमावू लागला आहे. मुख्य बाजारपेठेत दिवसाही शुकशुकाट दिसत आहे. त्यामुळे पुढील सुट्ट्यांच्या हंगामात काय होणार, या चिंतेमध्ये स्थानिक दिसत आहेत.

माथेरानच्या पर्यटनासाठी ही धोक्याची घंटा असून शासकीय नियमांच्या जाचक अटींमुळे माथेरानचे पर्यटन धोक्यात आले आहे. वर्षांनुवर्षे पर्यटन वाढीस असणारे प्रकल्प शासनाच्या अनास्तेमुळे झालेले नाहीत. येथील रस्ते, दळणवळण तसेच नगरपालिकेच्या माध्यमातून मनोरंजनासाठी काही सुविधा नसल्यामुळे पर्यटक दुसऱ्या स्थळाकडे कूच करताना दिसत आहेत. माथेरान परिसरात अत्याधुनिक सुसज्ज पार्क उभे राहत आहेत. पण, माथेरान स्थळ आजही दुर्गम म्हणून ओळखले जाते. दळणवळणाची खर्चिक बाब असल्याने पर्यटक येथून जाताना अनेकदा वाईट अनुभव घेऊन जात आहेत.

# सागरी महामंडळाची मालवाहतुकीत भरारी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**२५ वर्षांतील सर्व विक्रम मोडले सागरी महामंडळाने सलग दुसऱ्या वर्षी मालवाहतुकीत आपल्याचा विक्रम मोडीत काढला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात ७६ दशलक्ष टन मालवाहतूक जलमार्गाने सागरी महामंडळाने एक नवीन भरारी घेतली आहे.या मालवाहतुकीतून अंदाजी २१५ कोटींपेक्षा जास्त महसूल राज्य सरकारचा तिजोरीत जमा झाल्याची माहिती सागरी महामंडळाकडून देण्यात आली आहे.**



गेल्या काही वर्षापासून राज्याच्या किनारपट्टी आणि किनारपट्टीच्या पाठीमागील प्रदेशाला आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून जल मार्ग मालवाहतुकीचे चालना देण्याकरिता सागरी महामंडळाने मोठ्या प्रमाणांत बंदरांचा विकास केला आहेत. विशेष म्हणजे जलवाहतूक हा तुलनेने स्वस्त आणि पर्यावरणपूरक मार्ग असल्याने किनाऱ्यावरील जेट्टीचा विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

त्यामुळे गेल्या पंचवीस वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रथमच २०२२-२३ या आर्थिक वर्षात ७१ दशलक्ष टन मालवाहतूक जलमार्गाने केली. या मालवाहतुकीतून अंदाजी २०० कोटींचा महसूल राज्य सरकारचा तिजोरीत जमा झाले होते. तसेच २०२३-२४ या आर्थिक वर्षात ७६ दशलक्ष टन मालवाहतूक जलमार्गाने सागरी महामंडळाने एक नवीन भरारी घेतली आहे. मालवाहतुकीत तब्बल गेल्या आर्थिक ७ टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली आहे.

राज्यात डाहून, बेलापूर, करंजा, दिघी, रत्नागिरी, जयगड, दाभोळ, विजयदुर्ग, वाशी, ट्रॉम्बे, बँकॉट सारख्या ५ मालवाहतूक बंदरे आहे. या बंदरातून कोळसा, एलपीजी, एलनजी, सिमेट, साखर, युरिया सारखे अनेक वस्तू मोठ्या प्रमाणात जल मार्गाने मालवाहतूक केली जाते.२०१७-१८ या राज्यातील समुद्र मार्गाने ३७.४ दशलक्ष टन मालवाहतूक केली होती. आता २०२३-२४ या आर्थिक वर्षात मालवाहतूक ७६ दशलक्ष टनचा घरात पोहचली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात ५२ दशलक्ष टन मालवाहतूकीतून केली होती. गेल्या चार वर्षांत २४ दशलक्ष टन जल मार्गाने मालवाहतूक वाढ झाल्या असल्याची माहिती सागरी महामंडळाने दिली आहे.

# उरण खाडीपूल दुरुस्तीचे काम पूर्ण

**। उरण । वार्ताहर ।**

सिडकोने उरण पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या दुरुतीचे काम पूर्ण झाल्याची माहिती सिडकोच्या सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे लवकरात लवकरात लवकर हा पूल खुला करून मार्गावरून प्रवासी एसटी बस सुरू करण्याची मागणी आता येथील नागरिकांनी केली आहे.

खाडीपूल त्वरित दुरुस्त करावा या मागणीसाठी जनवादी महिला संघटनेने तसेच बोकडवीरा ग्रामस्थांनीही आंदोलन केले होते. सिडको कार्यालयावर आंदोलन केले होते. हा पूल कमकुवत असल्याचा अहवाल आयआयटीच्या तज्ज्ञांनी दिला होता. त्यामुळे मार्गावरील जड व प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस हाईटगेट लावून बंद करण्यात आल्या आहेत. मात्र या हाईट गेटमुळे आतापर्यंत २५ पेक्षा अधिक वाहनांचा अपघात झाला आहे. यामध्ये एका महिलेचा मृत्यूही झाला आहे. तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

सिडकोचे अधीक्षक अभियंता श्रीकांत गोसावी यांनी जानेवारी २०२४ पर्यंत पुलाची दुरुस्ती करून



प्रवासी वाहनांसाठी खुला करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कामाला सुरुवात झाली. मात्र काम पूर्ण होण्यास विलंब झाला असून त्यासाठी एप्रिल महिना उजाडला आहे. हा पूल बंद असल्याने येथील नागरिक, विद्यार्थी यांना अधिक वेळ आणि खर्चाचा प्रवास करावा लागत आहे. या पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे. त्याचे प्रमाणपत्र आयआयटीकडून आले असून रस्ता जड वाहनांसाठी खुला करण्यासाठी वाहतूक विभागाला पत्र देण्यात येणार असून त्यानंतर या मार्गावरील हाईट गेट हटविण्यात येणार असल्याची माहिती सिडकोकडून देण्यात आली आहे.

# गाव नकाशे नसल्याने मच्छीमारांचे अस्तित्व धोक्यात

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण किनारपट्टीवर वास्तव्य करणाऱ्या मच्छीमार आणि इतर समाजांच्या गावाचे नकाशेच नसल्याने येथील नागरिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पंचवीस वर्षांपासून याची ग्रामस्थांना प्रतीक्षा आहे.



राज्यातील सात किनारी जिल्ह्यांतील गावांचे गाव नकाशेच अस्तित्वात नसल्याने लाखो पारंपरिक मच्छीमारांची परवड झाली आहे. त्यामुळे पर्यावरणाचीही मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. सिडकोने तर याचाच फायदा घेऊन हजारो हेक्टर जमिनी सीआरझेडचे उल्लंघन करून विविध प्रकल्प, कंपन्या व भांडवलदारांच्या घशात घालून अब्जावधींचा नफा कमावला असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर संघटनेचे अध्यक्ष व पर्यावरणवादी नंदकुमार पवार यांनी केला आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी सात समुद्रकिनारे असलेले जिल्हे आहेत. या सातही जिल्ह्यांत मासेमारी करणाऱ्या गावांची संख्या मोठी आहे. पारंपरिक पद्धतीने पिढीजात मासेमारी करणाऱ्या या मच्छीमारांच्या समुद्र, खाडी आदी सागरी क्षेत्रांतील विविध किनाऱ्यांवर राखीव जागा आहेत. या राखीव जागांचा उपयोग स्थानिक मच्छीमार समाजाचा विकास व उन्नती व्हावी म्हणून मासळीची चढ-उतार करण्यासाठी मासेमारी जेट्टी, आईस फॅक्टरी, मासेमारी बोटींची डागडुजी, मच्छीमार जाळी, मासळी सुकविण्यासाठी करीत होते.

पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांचे क्षेत्र अबाधित ठेवण्यासाठी, मच्छीमारांबरोबरच विविध सागरी जैवविविधतेचे संरक्षण व्हावे या मुख्य हेतूने १९९१ साली सीआरझेडचा कायदा अमलात आणण्यात आला आहे. सीआरझेडचा कायदा लागू झाल्यानंतर मात्र मागील २५ वर्षांपासून राज्यातील सात जिल्ह्यांतील कोस्टल झोन क्षेत्रात गाव नकाशे तयार करण्यात आलेले नाहीत. यामुळे कोस्टल जिल्ह्यातील पारंपरिक मासेमारी आणि सागरी जैवविविधता पुरती धोक्यात आली आहे. राज्यातील सात जिल्ह्यांतील कोस्टल झोन क्षेत्रात गाव नकाशे अस्तित्त्वात आलेच नसल्याने त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. गाव नकाशांअभावी पारंपरिक पद्धतीने पिढीजात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांच्या समुद्र, खाडी आदी क्षेत्रांतील विविध किनाऱ्यांवरील राखीव जागा नष्ट झाल्या आहेत.

# गुंतवणुकीतून भरघोस परताव्याचे आमिष

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

समाज माध्यमातून कमी वेळात जास्त परतावा अशी जाहिरात करून त्याला बळी पडलेल्या गुंतवणूकदाराची २१ लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उदय रत्नपारखी असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते एका खाजगी कंपनीत काम करत असून गुंतवणुकीवर भरघोस परतावा ते हि कमी वेळेत अशी जाहिरात त्यांच्या वाचनात आली. उदय यांनी त्या लिंकवर क्लिक करताच त्यांचा समावेश एका व्हाटस ॲप समूहात करण्यात आला. त्यांना संबंधित व्यक्तीने फोन करून कागदपत्रे मागवली त्यानुसार कागदपत्रे ऑनलाईन देताच एका ॲपद्वारे ऑनलाईन खाते उघडण्यात आले. आणि खाते क्रमांक म्हणून एक मोबाईल क्रमांक देण्यात आला. उदय यांनी काही पैसे भरले व त्यांना परतावा हि चांगला मिळाला. म्हणून त्यांनी थोडे थोडे करीत १ मार्च ते १ एप्रिल दरम्यान तब्बल २१ लाख ६५ हजार १२७ रुपये ऑनलाईन गुंतवले. हे पैसे त्यांनी विविध बँकेत देण्यास सांगण्यात आले होते.

किती रक्कम भरली आणि गुंतवणूकी वर किती परतावा मिळाला हे कळण्यासाठी जो ॲप डाऊन लोड केला होता त्यानुसार उदय यांच्या नावावर ४४ लाख ८१ हजार ६३५ रक्कम जमा असल्याचे दिसत होते. मात्र हि रक्कम उदय यांच्या बँक खात्यात वळती होत नव्हती. ही रक्कम त्यांनी वेळोवेळी मागितली मात्र परतावा जेवढा जमा झाला त्याच्या केवळ २० टक्के रक्कम मिळेल असे सांगून त्यांच्या बँक खात्यात ५ लाख ५४ हजार १२७ रुपये पाठवले. मात्र आता रक्कम हवी असेल तर ६ लाख ७२ हजार २२४ रुपये कर अगोदर भरावा लागेल असे त्या अनोखळी व्यक्तीने सांगितले.

# उरणकरांवर पाणीटंचाईचे संकट

## दोन्ही धरणांनी तळ गाठला

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई आणि पुनाडे या दोन्ही धरणांनी तळ गाठला आहे. तालुका आणि उरण शहरातील पाणीकपातीनंतरही ऐन उन्हाळ्यातच उरणकरांवर पाणीटंचाईचे संकट आणखी गहिरे झाले आहे. पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याने मात्र शहरवासीयांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

पावणेदोनशे वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या उरण नगर परिषदेची पाणीपुरवठ्याची स्वत:ची अशी कोणतीही योजना नाही. त्यामुळे उरण नगर परिषद एमआयडीसीकडून पाणी विकत घेऊन शहरवासीयांना पाणीपुरवठा करीत आहे. उरण नगर परिषदेची लोकसंख्या ४० हजारांच्या आसपास आहे.

उरण कोटगाव ते मोरा या दरम्यान असलेल्या विविध २१ प्रभागांत राहणाऱ्या शहरवासीयांना पावसाळ्यानंतर नोव्हेंबरपासूनच पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. शहरासह उरण तालुक्याला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणाने तळ गाठला आहे. यामुळे उरण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसीने मागील सहा महिन्यांपासूनच मंगळवार आणि शुक्रवार अशी दोन दिवस पाणीकपात लागू केली आहे. त्यानंतरही आठवड्यातील पाच दिवस शहरवासीयांना फक्त दिवसात एकच तास पाणी दिले जाते. नियोजनाचा अभाव आणि अपुरा पाणीपुरवठा यामुळे पाणीटंचाईची समस्या शहरवासीयांना याआधीही भेडसावत होती. त्यातच उष्णतेचा पारा चढा असल्याने पाण्याचा वापरही वाढला आहे.

त्यामानाने उरण नगर परिषदेकडून शहरातील नागरिकांच्या आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा होत नाही. पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याची मागणी शहरवासीयांकडून केली जात आहे. उरण शहरातील ४० हजार नागरिकांसाठी दररोज ५० लाख लिटर पाण्याची गरज आहे. पाणी सोडण्यात आल्यानंतरही रिकामी पाइपलाइन भरण्यासाठी बराच वेळ जातो. यामुळे शहरातील नागरिकांना अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होतो, असा दावा उरण नगर परिषदेचे वरिष्ठ अभियंता झेड. आर. माने यांनी केला आहे.



# पालीत मुस्लीम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन

**। पाली । वार्ताहर ।**

सध्या सुरू असलेल्या मुस्लीम बांधवांच्या रोजाच्या पवित्र महिन्यानिमित्त सुधागड तालुका बौद्धजन पंचायत व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लीम बांधवांकडून देखील बुद्ध जयंती दिनी भीम अनुयायांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात येते. या इफ्तार पार्टीनिमित्त दोन समाजामधील सामाजिक सलोख्याचे दर्शन घडून आले. मुस्लीम बांधवांनी भीम अनुयायांचे आभार मानले.

या इफ्तार पार्टीला तहसीलदार उत्तम कुंभार, आरपीआय कोकण प्रदेश संघटक रवींद्रनाथ ओव्हाळ, तालुका अध्यक्ष राहुल सोनावळे, बौद्धजन पंचायत मध्यवर्तीचे अध्यक्ष भगवान शिंदे, मुस्लिम समाज अध्यक्ष सलाम पानसरे, इम्तियाज पठाण, निसारभाई चौधरी, शकील अन्सारी, लतिफ कबळे, बौद्धजन पंचायत महिला अध्यक्षा नूतन शिंदे,रोहिणी जाधव, प्रिया वासनिक, संस्थेचे सचिव राजेश गायकवाड, प्रा.विनोद वासनिक, शिक्षक नरेश शिंदे, राजेश गायकवाड, राजेश जाधव, नितीन जाधव, संदेश शिंदे, ॲड. सुशील गायकवाड, युवाध्यक्ष निशांत पवार, महेश वाघमारे, मिलिंद शिंदे, सतीश गायकवाड, संजीवनी जाधव, कविता पडवळ व बहुसंख्येने मुस्लीम बांधव उपस्थित होते.

# राडारोडा टाकणारे चार डंपर जप्त; सिडकोची कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळाच्या दक्षता विभागाने पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावाजवळ राडारोडा टाकणाऱ्या दोघांसह चार डंपरवर कारवाई केली आहे. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाशेजारी मोठ्या प्रमाणात सिडकोच्या जमिनीत राडारोड्याचा भराव टाकण्याचे काम अवैधपणे केले जाते. मुंबई येथून राडारोडा आणून तो पनवेल परिसरात टाकणारी अनेक टोळ्या सक्रीय आहेत. सिडको मंडळाच्या अधिकाऱ्यांनी अनेकदा याबाबत रितसर गुन्हे दाखल केले आहेत.

राडारोड्यामुळे आरोग्यास धोका तसेच पर्यावरणास हानी होऊ शकते. त्यामुळे सिडको मागील वर्षापासून राडारोडा टाकणाऱ्यांवर नियंत्रण आणत आहे. सिडको मंडळाच्या दक्षता विभागाचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या यांच्या नेतृत्वाखाली दक्षता विभाग, सिडकोचे सुरक्षा विभाग, अभियांत्रीकी विभाग आणि पोलीस विभाग यांच्यात समन्वय ठेऊन ही कारवाई करण्यात



आली.गुरुवारी दुपारी दोन वाजता सिडकोचे दक्षता पथक कुंडेवहाळ परिसरात फिरत असताना त्यांना दुपारी २ ते ४ वाजण्याच्या सूमारास सर्व्हे क्रमांक ३७ येथे राडारोड्याने भरलेले चार डंपर खाली करुन जेसीबी व डोझरच्या सहाय्याने हा राडारोडा सपाटीकरणाची काम सुरु असल्याचे दिसले. सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणाहून डंपर चालक बबलु यादव, राकेशकुमार सोनकर यांना डंपरसहीत ताब्यात घेतले. तसेच दोन डंपरवरील चालक आणि जेसीबी व डोझरचे ऑपरेटर येथून पळून गेले.

# बारणेंच्या सभेला शिवसैनिकांची अनुपस्थिती

**उरण :** उरण जेएनपीटी टाऊनशिप येथे झालेल्या बारणेंच्या सभेला शिवसैनिक व पदाधिकारी या सर्वांनी अनुपस्थिती दाखवून आपलीं नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी उरण विधानसभा मतदारसंघात शिवसेना संघटनेची कुठलीही माहिती न घेता. जिल्हा उपप्रमुख व संघटक यांची नेमणूक केली आहे. या दोघांच्याही गावात आज घडीला शाखाप्रमुख नाही, स्वत:चे सख्खे भाऊ दुसऱ्या पक्षात कार्यरत आहेत. असलेल्या शाखा व त्यांची कार्यालये बंद पाडली आहेत. हे सर्व बिनबोभाट सुरू आहे.असा आरोप येथील पदाधिकारी करीत आहेत. वरिष्ठांनी याबाबत गोपनीय माहिती घेऊन वस्तुस्थिती समजून घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# रविंद्रनाथ ओव्हाळ यांना पुरस्कार

**पाली :** भिमछाया सांस्कृतिक केंद्र मुंबई या संस्थेच्या वतीने सुधागड तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार रविंद्रनाथ ओव्हाळ यांना सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते समाज सेवक



पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कोकण प्रांत अध्यक्ष प्रकाश मोरे यांना महाराष्ट्र शासनाने समाज भूषण पुरस्कार दिल्याने मोरे यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त या पुरस्कार वितरण सोहळ्याचे डॉ.माईसाहेब बाबासाहेब आंबेडकर सभागृह भिमछाया सांस्कृतिक केंद्र कालिना सांताक्रुज मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते.

# कुरडई, पापड करण्यासाठी महिलांची लगबग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उन्हाळा म्हटलं की सगळ्यांना वेध लागतात ते वाळवणाचे. उन्हाळ्यात सगळ्यांच्याच घरात वाळवण घातली जातात. वाळवण घालण्यासाठी घरातील प्रत्येक व्यक्ती तयारीला लागते. वाळवणाचे पदार्थ बनवण्यासाठी पनवेलच्या ग्रामीण भागासह शहर व वसाहत परिसरात महिलांची लगबग सुरू झाली आहे. कुरडई, पापड्या, खरवड्या, पापड, वेफर्स, सांडगे, बॉबी असे पदार्थ बनवण्यात येथील महिला सध्या व्यग्र आहेत.

महिला उन्हाळ्यामध्ये वाळवणाचे पदार्थ घरीच तयार करतात. वाळवण तयार करण्यासाठी खूप काळजी घ्यावी लागते. उन्हाचे चटके बसू नयेत किंवा वाळवणाला चांगले ऊन मिळावे, म्हणून हे सगळे पदार्थ सकाळी लवकर उठून तयार केले जातात. वाळवणाचे पदार्थ तयार करताना अनुभव, कौशल्य आणि खूप मेहनत घ्यावी लागते. या वाळवणामध्ये बटाट्याचा किस, पापड, मसाले, आंबा, लिंबू, मिरचीचे लोणचे, कुरडया, मिरची पावडर, शेवया यांसारख्या अनेक पदार्थांचा समावेश असतो. हे पदार्थ उन्हाळ्यात बनवून वर्षभर साठवून आपल्याला हवे तेव्हा तळून, भाजून खाता येतात. तसेच या दिवसांत गहू, तांदूळ, बाजरी आदी कडधान्य यांना ऊन देण्यात येते. पूर्वी उन्हाळा आला की, साठवणीचे पदार्थ करण्याची घरी लगबग असायची; परंतु आता शहरामध्ये फार कोणी वाळवणाचे पदार्थ करत नाहीत. महिलांना नोकरीमुळे वेळ मिळत नसल्याने हे पदार्थ रेडिमेड घेतले जातात. मात्र, ग्रामीण भागात बऱ्यापैकी महिला आजही वाळवण करतात.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका

# बाधितांना लोकसभेनंतर भूसंपादनाचा मिळणार मोबदला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये पनवेल तालुक्यातील ४४ गावांची जमिनीचे क्षेत्र बाधित होत असून मागील दीड वर्षात भूसंपादनातील दरनिश्चितीची प्रक्रिया रेंगाळल्याने अद्याप भूसंपादनाचा मोबदला मिळू शकलेला नाही. लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी या मार्गात जमिनबाधित शेतकऱ्यांना हक्काचा मोबदला मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र निवडणूकीत महसूल अधिकारी गुंतल्याने आणि पनवेलच्या प्रांताधिकाऱ्यांच्या कार्यालयात कधी मोबदला मिळेल यासाठी खेट्या मारणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकच उत्तर वारंवार



देण्याऐवजी प्रांत कार्यालयाने लोकसभा निवडणूकीनंतर भूसंपादनाच्या मोबदला वाटपाच्या कामाला स्थगिती दिल्याचे फलक लावला आहे.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे अनेक सरकारी कामे ठप्प झाली आहेत. निवडणूक आयोगाचे काम महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असल्याने निवडणुकीचे काम करण्यासाठी इतर कामांना स्थगिती देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. मुंबई वडोदरा महामार्गाचे काम ५० टक्के पूर्ण झाल्याने या मार्गाचे काम पनवेल तालुक्यातील मोरबे गावापर्यंत जोरदार सुरु आहे. परंतू या मार्गाचा पुढील भाग म्हणजे विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेचा पहिला टप्पा अद्याप भूसंपादन पूर्ण न झाल्याने सुरु झालेले नाही.

सरकारने विरार अलिबाग मार्गिकेमधील भूसंपादन प्रक्रियेसाठी किशन जावळे यांची नेमणूक केली. जिल्हाधिकारी जावळे यांनी रखडलेली दरनिश्चितीची प्रक्रिया काही दिवसात केली. मात्र त्यानंतर लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने भूसंपादनाचा मोबदला गावकऱ्यांना देण्यात तांत्रिक अडचणी उभ्या राहील्या आहेत. सध्या पनवेलचे प्रांत अधिकारी कार्यालयाकडून मोरबे गावातील बाधित शेतजमिनींच्या मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या नोटीसीमध्ये कोणकोणती कागदपत्र सादर करावी याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली आहेत. मोरबे प्रमाणे इतर ४३ गावांमध्ये ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**निवडक**

## कबड्डी प्रशिक्षण शिबीर

**खांब :** एस.एन.एस.स्पोर्टस क्लब पुरस्कृत मंगळवार (दि.९) ते शुक्रवार (दि.१२) या कालावधीत कुमार गट कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन जय बजरंग कबड्डी मैदान रोहा येथे सायंकाळी ५ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. रूपेश रटाटे, दिनेश कांबळे, भरत मालुसरे, गौरव नाईक, राकेश गायकवाड या तज्ञ प्रशिक्षकांकडून खेळाडूंना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी राज मोरे ८६२४९४२७६९ व सौरव वाघवले ८५३०९३०८२८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आले आहे.

## खो-खो असोसिएशन निवडणूक

**पुणे :** महारराष्ट्र खो-खो असोसिएशनची निवडणूक रविवारी (दि.७) २०२४ ते २०२८ या कालावधी करता जाहीर झाली होती. ही निवडणूक बिनविरोध पार पडली. यावेळी अध्यक्षपदी संजीवराजे नाईक निंबाळकर, उपाध्यक्षपदी डॉ. जितेंद्र आव्हाड, अनिकेत तटकरे, महेश गादेकर, अशोक पितळे, सचिन गोडबोले, सरचिटणीसपदी डॉ. चंद्रजीत जाधव, संयुक्त चिटणीसपदी डॉ. राजेश सोनवणे, डॉ. पवन पाटील, जयांशू पोळ, बाळासाहेब तोरसकर, वर्षा कच्छवा, खजिनदारपदी ॲड. गोविंद शर्मा यांची बिनविरोध नियुक्ती करण्यात आली.

## चाहत्यासोबत स्टेडियममध्ये फ्रॉड

**चेन्नई :** चेन्नई आणि हैदराबाद यांच्यामध्ये शुक्रवारी सामना झाला. या सामन्यात हैदराबादने चेन्नईचा सहा विकेटने पराभव केला. या रोमांचक सामन्याचा सर्वांनीच आनंद घेतला. पण चेन्नईच्या एका चाहत्यासाठी हा सामना त्रासदायक ठरला. सोशल मीडियावर या सामन्यादरम्यानाचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. चेन्नईच्या एका चाहत्याला चक्क स्टेडियममध्ये सीट मिळाली नसल्याचं यामध्ये दिसत आहे. त्या चाहत्यानं ४५०० रुपये खर्च करुन सामन्याचं तिकिट खरेदी केले होते.

## राजस्थानला मोठा धक्का

**जयपूर :** आयपीएलमध्ये राजस्थानने सलग चौथ्या विजयासह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. जयपूरमध्ये खेळल्या गेलेल्या महत्त्वाच्या सामन्यात राजस्थानने आरसीबीविरुद्ध पाच चेंडू शिल्लक असताना सहा गडी राखून विजय मिळवला. मात्र, या विजयासह राजस्थानलाही मोठा धक्का बसला आहे. संघाचा स्टार वेगवान गोलंदाज दुखापतीमुळे गुजरातविरुद्धचा सामना खेळू शकणार नाही. राजस्थान रॉयल्सचे सहाय्यक प्रशिक्षक शेन बॉन्ड यांनीच सामन्यानंतर ही माहिती दिली.

## सुमितने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** भारताचा पुरूष एकेरीतील टेनिसपटू सुमित नागलने इतिहास रचला. माँटे कार्लो मास्टर्सच्या मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवणारा तो ४२ वर्षानंतरचा भारताचा पहिला टेनिसपटू ठरला. ९१ व्या मानांकित सुमित नागलने अर्जेंटिनाच्या फाकुंडो डिआझ एकोस्टाचा तीन सेटमध्ये पराभव केला. त्याने सामना ७-५,२-६, ६-२ असा जिंकला. गेल्या चार दशकात या स्पर्धेत एकाही भारतीय टेनिसपटूला मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवण्याची संधी मिळाली नव्हती. यापूवी १९८२ मध्ये रमेश क्रिष्णन यांनी अशी कामगिरी केली होती.

# मुंबईची पहिल्या विजयाला गवसणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२४ मधील पहिला विजय मिळवला आहे. पहिल्या तीन सामन्यांमधील पराभवानंतर घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सने पहिल्या विजयाला गवसणी घातली आहे. मुंबई इंडियन्सने पहिल्यांदा फलंदाजी करताना ५ बळी गमावत २३४ धावा केल्या होत्या. दिल्ली कॅपिटल्सला २० षटकांमध्ये ८ बाद २०५ इतक्या धावा करता आल्या. मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सवर २९ धावांनी विजय मिळवला आहे.**



मुबई इंडियन्सने पहिल्यांदा फलंदाजी करताना ५ बळी गमावत २३४ धावा केल्या. मुंबईच्या डावाची सुरुवात करणाऱ्या रोहित शर्मा आणि इशान किशनने ८० धावांची सलामीची भागिदारी केली. रोहित शर्माला अक्षर पटेलने ४९ धावांवर बाद केले. यानंतर फलंदाजीला आलेला सूर्यकुमार यादव शुन्यावर बाद झाला. इशान किशनला देखील अक्षर पटेलने बाद केले. इशान किशनने ४२ धावा केल्या. यानंतर फलंदाजीला आलेल्या हार्दिक पांड्या आणि टीम डेव्हिडने मुंबईचा डाव सावरला. हार्दिक पांड्यानं ३९ धावा केल्या तर टीम डेव्हिडनं ४५ धावा केल्या.

मुंबईकडून पहिली मॅच खेळणाऱ्या रोमारियो शेफर्डनं १० बॉलमध्ये ३९ धावा केल्या. शेफर्डनं ४ सिक्स आणि ३ चौकारांच्या जोरावर मुंबईला २३४ धावांपर्यंत पोहोचवले. शेफर्डनं २० षटकांमध्ये ३२ धावा काढल्या. शेफर्डने २० व्या षटकात नॉर्खियाला ३२ धावा काढल्या. त्याच ३२ धावा दिल्ली कॅपिटल्ससाठी महागात पडल्या. दिल्लीचा २९ धावांनी पराभव झाला.

यावेळी दिल्ली कॅपिटल्सचा कॅप्टन रिषभ पंतने पहिल्यांदा बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय दिल्लीच्या अंगलट आला. दिल्लीपुढे मुंबई इंडियन्सने ५ बळी गमावत २३४ धावांचे आवाहन ठेवले. मुंबईने दिलेल्या आवाहानाचा पाठलाग करताना रिषभ पंतचा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी अभिषेक पोरेलला पाठवण्याचा निर्णय चुकला. अभिषेक पोरेलनं ४१ धावा केल्या मात्र, त्याचे स्ट्राइक रेट जसं हवं होतं तसं नव्हते. दिल्लीकडून पृथ्वी शॉने ६६ धावा केल्या. तर, स्टब्सने २५ बॉलमध्ये ७१ धावा केल्या. दिल्लीचे इतर फलंदाज मात्र चांगली कामगिरी करु शकले नाही.

### मुंबईने विजयाचं खातं उघडलं

**मुंबई इंडियन्सला यंदाच्या आयपीएलमध्ये पहिल्या विजयाची प्रतीक्षा होती. अखेर मुंबई इंडियन्सनं दिल्लीवर विजय मिळवला आहे. मुंबईनं पहिला विजय मिळवला असून आता त्यांचा सामना दोन बलाढ्य संघांसोबत होणार आहे. ११ एप्रिलल मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु अशी मॅच होईल. तर, १४ एप्रिलला मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज आमने सामने येतील.**

# दिल्लीविरुद्ध रो‘हिट’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२४ स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स संघात सामना झाला. वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात रोहित शर्माने मोठ्या विक्रमांना गवसणी घातली आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्माने २७ चेंडूत ४९ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ६ चौकार आणि ३ षटकार मारले. त्याची ही खेळी विक्रमीही ठरली. या खेळीदरम्यान रोहितने टी-२० क्रिकेटमध्ये १५०० व्यांदा चेंडू सीमापार करण्याचा म्हणजेच १५०० बाऊंड्री मारण्याचा विक्रम केला आहे. असा पराक्रम करणारा तो पहिलाच भारतीय ठरला.

आत्तापर्यंत टी-२० क्रिकेटमध्ये १५०० बाउंड्री कोणत्याच भारतीय क्रिकेटपटूला मारता आलेल्या नाहीत. त्याच्यापाठोपाठ विराट कोहलीने १४८६ बाऊंड्री मारल्या आहेत. दरम्यान ७ एप्रिलपर्यंत टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक बाऊंड्री मारणाऱ्या क्रिकेटपटूंच्या यादीत अव्वल क्रमांकावर ख्रिस गेल आहे. त्याने २१९६ बाऊंड्री मारल्या आहेत.



### सर्वाधिक बाऊंड्री मारणारे क्रिकेटपटू

| | | |
|---|---|---|
| २१९६ | – | ख्रिस गेल |
| १८५५ | – | ॲलेक्स हेल्स |
| १६७३ | – | डेव्हिड वॉर्नर |
| १६७० | – | कायरन पोलार्ड |
| १५५७ | – | ॲरॉन फिंच |
| १५०३ | – | रोहित शर्मा |

### रोहितच्या दिल्ली विरुद्ध १००० धावा

**रोहितने या खेळीदरम्यान दिल्लीविरुद्ध १००० धावाही पूर्ण केल्या. त्याने यापूर्वी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धही १००० धावा केल्या आहेत. त्यामुळे तो आयपीएलमध्ये दोन संघांविरुद्ध १००० किंवा त्यापेक्षा अधिक धावा करणारा तिसराच खेळाडू ठरला आहे. यापूर्वी असा विक्रम केवळ डेव्हिड वॉर्नर आणि विराट कोहलीला करता आला आहे.**

# विदीत गुजराथीचा सनसनाटी विजय

### प्रज्ञानंदवर गुकेशची मात

**। टोरांटो । वृत्तसंस्था ।**

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या हिकारू नाकामुराचा बचाव भेदत ग्रँडमास्टर विदीत गुजराथीने कँडिडेट्स बुद्धिबळमध्ये सनसनाटी विजय मिळवला आहे. तर, आर. प्रज्ञानंद आपल्याच देशाच्या डी गुकेशकडून दुसऱ्या फेरीत पराभूत झाला. महिलांच्या दुसऱ्या फेरीत आर. वैशालीला झोंगयी टॅनकडून कडवा संघर्ष केल्यानंतर पराभवाचा सामना करावा लागला. कोनेर हम्पीने कॅटेरिना लागनोविरुद्धचा डाव अनिर्णित सोडवला. मात्र, चीनच्या झोंगयी टॅन हिने स्वतंत्रपणे आघाडी घेतली आहे. हम्पी, सालिमोवा आणि लँगो संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहेत. तर, वैशालीला संयुक्तपणे सहाव्या स्थानावर समाधान मानावे लागले.



### गुणांक (दुसरी फेरी)

**पुरुष :** इयान नेपोम्नियाची (१.५), फिरोझा अलिरेझा (०.५), आर प्रज्ञानंद (०.५), डी गुकेश (१.५), हिकारू नाकामुरा (०.५), विदित गुजराथी (१.५), फॅबियानो कारुआना (१.५), निजात आबासोव (०.५).

**महिला :** झोंगयी टॅन (२), आर वैशाली (०.५), कॅटेरिना लागनो (१), कोनेरु हम्पी (१), नुरग्युल सलीमोवा (१), टिंगकजी लेई (०.५), अलेक्झांड्रा गोर्याचकिना (१.५), ॲना मुझिचुक (०.५).

# रोहित शर्मा झाला भावुक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

‘द ग्रेट इंडियन कपिल शो’ या कपिलच्या शोमध्ये भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर हे दोन खेळाडू सहभागी झाले होते. शोमध्ये सहभागी झालेल्या रोहितने विश्वचषका दरम्यानच्या काही जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या पराभवावर भाष्य केले.



यावेळी रोहित शर्मा म्हणाला, ‘विश्वचषकाच्या अंतिम सामन्याच्या दोन दिवसआधी आम्ही अहमदाबादला गेलो. संघातील वातावरण अतिशय सुंदर होते. आम्ही अंतिम फेरीत सुद्धा चांगली सुरुवात केली होती. शुभमन आधी बाद झाला. परंतु, जेव्हा तुम्ही अंतिम सामना खेळत असता, तेव्हा मोठी धावसंख्या उभारावी लागते. जेणेकरून प्रतिस्पर्धी संघावर दबाव निर्माण होईल. गिल बाद झाल्यावर मी आणि विराटने भागीदारी केली. पण, ऑस्ट्रेलिया या लढाईत आमच्यापेक्षा एक पाऊल पुढे होती. त्यांनी उत्तम खेळ केला. त्यांच्या खेळाडूंनी उत्तम पार्टनरशीप देखील केली. मला वाटलं विश्वचषक भारतात होऊनही हरलो, त्यामुळे आज संपूर्ण देशातील चाहते आमच्यावर रागावले असतील. पण, लोकांनी आम्हाला सांभाळून घेतलं. आमचं कौतुक केले, असे रोहितने सांगितलं.

# माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा

### शुभम रांजाणे टॅटू स्पर्धेत द्वितीय

**। माथेरान । वार्ताहर ।**

पुणे येथील खर्डी याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या टॅटू स्पर्धेत माथेरानच्या शुभम गणपत रांजाणे याने द्वितीय क्रमांक पटकावला असून माथेरानच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ही स्पर्धा खर्डी येथील मेफिल्ड वेन्यू हॉल येथ्से आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी थायलंड येथील प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

या स्पर्धेचे दि.४ ते ६ या तीन दिवसांत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दुरदुरुन टॅटू आर्टिस्ट सहभागी झाले होते. एकूण १५० जणांचा यामध्ये समावेश होता. नागपूर येथील टॅटू आर्टिस्ट याने प्रथम क्रमांक पटकावला तर, माथेरानच्या शुभम रांजणे याने द्वितीय क्रमांक पटकावून सर्वांची वाहवा मिळवली.



२०२१ मध्ये पंजाब येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये शुभम याने तीन पारितोषिके प्राप्त केली होती. तर २०२३ मध्ये गोवा येथील स्पर्धेत दोन बक्षिसे प्राप्त केली आहेत. नुकताच पुण्यात पार पडलेल्या या स्पर्धेत शुभम याच्या नावावर दोन पारितोषिके प्राप्त करून त्याने माथेरानचे नाव उज्ज्वल केले आहे. आकर्षक ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि पस्तीस हजार रुपये किंमतींची टॅटू मशीन बक्षीस स्वरूपात शुभम रांजाणे याना देण्यात आली.

या यशाबद्दल शुभमला विचारले असता त्याने सांगितले की, माझ्याकडे ही छोटी कला अवगत झाली आहे. त्या माध्यमातून विविध स्पर्धेत विजयश्री खेचून माझ्या गावाचे नाव उंचावेल हा माझा प्रामाणिक प्रयत्न असणार आहे.

# आयपीएलमधले आठवे ‘विराट’ शतक

**। बेंगळूरू । वृत्तसंस्था ।**

आरसीबीची रन मशिन विराट कोहलीने राजस्थान रॉयल्स विरूद्धच्या सामन्यात शतकी खेळी केली. त्याने ७२ चेंडूत नाबाद ११३ धावांची खेळी करत आरसीबीला २० षटकात ३ बाद १८३ धावांपर्यंत पोहचवण्यात सिंहाचा वाटा उचलला. त्याने ६७ चेंडूत शतकी खेळी केली. त्याचे स्ट्राईक रेट हे १५६.९४ इतके आहे.

विराट कोहलीचे हे शतक आयपीएलच्या १७ व्या हंगामातील पहिले शतक ठरले तर वैयक्तिकरित्या त्याचे हे आयपीएलमधील आठवे शतक ठरले. विराट कोहली हा आयपीएल इतिहासात आठ शतके ठोकणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे. विराट कोहलीने आपल्या दमदार शतकानंतर थोडी अजब प्रतिक्रिया दिली. विराट कोहली म्हणाला की, मी आज आधीच काही ठरवून आलो नव्हतो. मला माहिती होतं की मी अती आक्रमकपणा दाखवू शतक नाही. मी गोलंदाजांना कायम हा कधी आक्रमक फटका खेळणार याचा अंदाज बांधायला भाग पाडले आहे.

# ऑस्ट्रेलियाची भारतावर मात; ५-१ असा सहज विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ताकदवान ऑस्ट्रेलियाने पहिल्या हॉकी कसोटी सामन्यात भारतीय संघाचा ५-१ असा धुव्वा उडवला. भारताकडून किमान जोरदार प्रतिकाराची अपेक्षा केली जात होती; परंतु ऑस्ट्रेलियाने त्यांना संधी दिली नाही. शनिवारी झालेल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून टॉम विकहॅम, टीम ब्रॅंड, ज्योएल रितांला आणि फ्लिन ऑलिवी यांनी गोल केले; तर भारताचा एकमेव गोल गुरजंत सिंगने ४७ व्या मिनिटाला केला.



घरच्या मैदानावर खेळत असलेल्या ऑस्ट्रेलियाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करून तिसऱ्याच मिनिटाला पहिला गोल केला आणि आपले खाते उघडले. टीम ब्रॅंडने हा गोल केला. त्याला मिळालेल्या दीर्घ पासवर प्रथम त्याने जरमनप्रीत सिंगला चकवले आणि लगेचच भारताचा गोलरक्षक श्रीजेशलाही चकवत चेंडू भारताच्या गोलजाळ्यात मारला. ऑस्ट्रेलियाने आपले आक्रमण कायम ठेवले आणि भारतीय बचावावर हल्ले केले.

मध्यांतरानंतर ऑस्ट्रेलियाने आपले आक्रमण कायम ठेवत भारतीयांना श्वास घेण्याचीही संधी दिली नाही. या संधीचा फायदा घेत विकहॅमने २० व्या आणि ३८व्या मिनिटाला असे दोन गोल केले. चौथ्या अर्धाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियाला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला; परंतु या वेळीही श्रीजेशने उत्तम गोलरक्षण केले. अखेर काही वेळानंतर भारताने प्रतिआक्रमण केले आणि गुरजंतने गोल करून पिछाडी कमी केली; पण हा गोल भारतीयांसाठी एकमेव ठरला.

# हार्दिक पांड्याची चूक नाहीः सौरव गांगुली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई इंडियन्सच्या कर्णधार बदलाच्या प्रक्रियेशी हार्दिक पांड्याचा संबंध नाही, त्यात त्याची काहीही चूक नाही, त्यामुळे प्रेक्षकांनी त्याची हुर्यो उडवू नये, असे स्पष्ट मत भारताचे माजी कर्णधार आणि दिल्ली संघाचे संचालक सौरव गांगुली यांनी व्यक्त केले.



मुंबई संघाला पाच वेळा आयपीएल विजेतेपद मिळवून देणाऱ्या रोहित शर्माला दूर करून यंदा गुजरात संघातून घेण्यात आलेल्या हार्दिककडे कर्णधारपद देण्यात आले. हा बदल मुंबई संघाच्या पाठीराख्यांना पटलेला नाही. परिणामी, प्रत्येक सामन्यात त्याची हुर्यो उडवण्यात येत आहे. हार्दिकची अशाप्रकारे हुर्यो उडवणे योग्य नाही. संघ मालक कर्णधार निवडत असतो हे सर्वच लीग स्पर्धांत घडत असते. इतकेच नव्हे, कोणत्याही खेळात कर्णधाराची नियुक्ती संबंधितांकडून केली जात असते, त्यामुळे एखादा असा बदल झाला तर तो स्वीकारायला हवा, असे गांगुली यांनी म्हटले आहे.

# विश्वचषकाआधीच डोकेदुखी वाढली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ नंतर लगेच आयसीसी टी-२० विश्वचषकाचे आयोजन होणार आहे. या वर्षी ही स्पर्धा वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत होणार असून त्याआधी भारतीय क्रिकेट संघासाठी टेन्शन वाढवणारी बातमी समोर आली आहे.

या स्पर्धेच्या आधी आयपीएलचा १७ वा हंगाम सुरू आहे. या महिन्याच्या अखेरपर्यंत टी-२० वर्ल्डकपसाठी भारतीय संघाची घोषणा होणार आहे. त्याआधी टीम इंडियातील अनेक स्टार खेळाडूंचा फॉर्म खराब असल्याचे दिसत आहे. २००७ साली झालेल्या पहिल्या टी-२० वर्ल्डकपचे भारताने विजेतेपद मिळवले होते. त्यानंतर भारताला टी-२० वर्ल्डकप जिंकता आलेला नाही. अशात या वर्षी भारतीय संघात असणारे पाच खेळाडू ज्यांचा फॉर्म आयपीएलमध्ये खराब आहे.



**१) जितेश शर्मा-** पंजाब किंग्जचा विकेटकीपर आणि फलंदाज जितेश शर्मा टी-२० वर्ल्डकपसाठी भारतीय संघातील दावेदार आहे. पण ४ लढतीत जितेशला १५च्या सरासरीने आणि १२६च्या स्ट्राइक रेटने ५८ धावा करता आल्या. सध्या ऋषभ पंत देखील फिट झाला असून मैदानावर परतला आहे. तो धावा देखील करतोय. जर जितेशची कामगिरी चांगली झाली नाही तर पंतला वर्ल्डकपचे तिकीट मिळू शकते.

**२) रविंद्र जडेजा-** चेन्नईचा ऑलराउंडर रविंद्र जडेजा धावा करतोय पण त्याला विकेट मिळत नाही. चार मॅचमध्ये जडेजाला फक्त १ विकेट मिळवता आली. फलंदाजी देखील तो फिनिशरची भूमिका पार पाडताना दिसत नाही.

**३) हार्दिक पांड्या-** एकदिवसीय चषकादरम्यान दुखापत झाल्याने हार्दिक अनेक महिने मैदानाबाहेर होता. त्यानंतर डीवाय पाटील टी-२० स्पर्धेत खेळला. आयपीएलच्या या हंगामात मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणाऱ्या हार्दिकला आतापर्यंत काही खास कामगिरी करता आलेली नाही. ३ सामन्यात त्याने फक्त ६९ धावा केल्या आहेत. गोलंदाजीत ११च्या इकोनॉमीने धावा देत फक्त १ विकेट घेतली आहे.

**४) यशस्वी जयस्वाल-** इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत धमाकेदार फलंदाजी करणाऱ्या यशस्वीला आयपीएलमध्ये धावा करता आल्या नाही. त्याने ३ लढतीत १३च्या सरासरीने ३९ धावा केल्या आहेत. यातील २४ धावा एका लढतीत केल्या आहेत. विश्वषकात यशस्वी रोहित शर्मासोबत सलामीला येऊ शकतो.

**५) मोहम्मद सिराज-** टी-२० विश्वचषकात बुमराह सोबत सिराजच्या हाती नवा चेंडू असेल. मात्र, सध्या आयपीएलमध्ये त्याची कामगिरी खराब आहे. चार मॅचमध्ये त्याला फक्त ३ विकेट मिळाल्या आहेत. तर त्याने १० पेक्षा अधिक इकोनॉमीने धावा दिल्या आहेत.

### बल्लाळेश्वर देवस्थान प्रीमियर लीग

# मुग्धा वॉरियर्सची विजयावर मोहोर

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

अष्टविनायक पाली येथे श्री बल्लाळेश्वर देवस्थान कर्मचारी वर्गातर्फे या वर्षी प्रथमच कर्मचारी वर्ग आणि विश्वस्तांच्या वर्गणीतून अंडर आर्म नाईट क्रिकेट स्पर्धाचे बल्लाळेश्वर देवस्थान प्रिमियर लीगचे आयोजन शनिवारी (दि.६) करण्यात आले होते. स्पर्धेत मुग्धा वॉरियर्स संघाने अंतिम विजयावर मोहर उमटवली.



या प्रीमियर लीग स्पर्धेमध्ये चार संघमालकांच्या संघानी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा पाहण्यासाठी महिला तसेच क्रीडारसिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे या संघातील खेळाडू चाळिशी पार केलेले होते. मात्र, त्यांचा जोश मात्र तरुणानाही लाजवेल असा होता. दुसऱ्या फेरीनंतर स्पर्धेमध्ये विशेष रंग चढला होता जवळ जवळ प्रत्येक सामना हा अटीतटीचा झाला.

स्पर्धेमधील चुरशीच्या अंतिम लढतीत संघ मालक वैभव आपटे आणि पिनाकीन कुंटे यांच्या मुग्धा वॉरीयर्स या संघाने आपला बहारदार खेळ करत अंतिम विजयावर मोहर उमटवली. या संघास रोख रक्कम ५ हजार व आकर्षक चषक तर संघ मालक अमोल साठे आणि प्रमोद पावगी यांच्या अस्मि वॉरियर्स संघाला उपविजेता चषकावर समाधान मानावे लागले. त्यांना रोख रक्कम ३ हजार व आकर्षक चषक देण्यात आले. संघ मालक जितेंद्र गद्रे यांच्या अमोघ टायगर्स संघाला तृतीय क्रमांकावर तर विश्वास गद्रे आणि अरुण गद्रे यांच्या गद्रे फायटर्स संघाला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले. या दोन्ही संघांना आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या लीगमधील मालिकावीर जितेंद्र गद्रे , उत्कृष्ट फलंदाज श्रीकांत शिंदे, उत्कृष्ट गोलंदाज ललित म्हात्रे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक संतोष दंत यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)